# मराठी

# सुलभभारती

## इयत्ता सहावी

सा विद्या या विमुक्तये

१९६७ २०१७

बालभारती सुवर्णमहोत्सव



- **खाली शब्दकोडे दिलेले आहे. उभ्या व आडव्या चौकटीत योग्य शब्द लिहून कोडे पूर्ण करा.**

**उभे शब्द**

(१) लाकूड कापण्याचे हत्यार, साधन

(२) एक पक्षी

(३) एक सुवासिक फूल

(४) मुलांना आकाशात उडवायला खूप आवडतो.

**आडवे शब्द**

(१) डोंगरापेक्षा लहान असणारी


(२) पाण्यात राहणारा प्राणी

(३) एक वाद्य

(४) कपडे ठेवण्यासाठी वापरले जाणारे साधन

(५) आपल्या देशाचे नाव

(६) जनावरांचा समूह



मंजुरी क्र. : जा.क्र. मराशैसंप्रप/अविवि/शिप्र/२०१५-१६/१६७३ दिनांक- ०६/०४/२०१६

मराठी

# सुलभभारती

इयत्ता सहावी

(हिंदी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी.)



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

प्रथमावृत्ती : २०१६

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती :**

श्री. नामदेव चं. कांबळे (अध्यक्ष)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. रोहिणी गायकवाड (सदस्य)
श्रीमती माधुरी जोशी (सदस्य)
श्री. अमर हबीब (सदस्य)
श्रीमती अर्चना नरसापूर (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

| | | |
|---|---|---|
| श्री. समाधान शिकेतोड | श्री. मयुर लहाने | श्री. संदीप रोकडे |
| श्री. बापू शिरसाठ | प्रा. विजय राठोड | श्रीमती स्मिता गालफाडे |
| श्रीमती प्रांजली जोशी | डॉ. माधव बसवंते | डॉ. प्रमोद गारोडे |
| श्रीमती वैदेही तारे | श्री. देविदास तारू | श्रीमती दीपाली पळशीकर |

**संयोजन :**
श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी
श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख
विषय सहायक, मराठी

**चित्रकार :** प्राजक्ता पगारिया
**मुखपृष्ठ :** प्राजक्ता पगारिया
**अक्षरजुळणी :** भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती :**
सच्चिदानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
संदीप आजगांवकर,
निर्मिती अधिकारी

**कागद:** ७० जी. एस. एम. क्रिमव्होव
**मुद्रणादेश:** N/PB/2016-17/.50
**मुद्रक :** M/s Sharp Industries, Raigad

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

## प्रस्तावना

**महाराष्ट्र शासनाने सन** २००९ मध्ये राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांसह सर्व अमराठी माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून मराठी हा विषय अनिवार्य करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. '**प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२**' मध्येही याच धोरणानुसार इयत्ता पहिलीपासून हिंदी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी मराठी (द्‌वितीय भाषा) अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमावर आधारित इयत्ता सहावीचे मराठी सुलभभारती हे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आनंद वाटतो.

अध्ययन–अध्यापन प्रक्रिया बालकेंद्रित असावी, स्वयंअध्ययनावर भर दिला जावा, अध्ययन व अध्यापन प्रक्रिया आनंददायी व्हावी असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पुस्तक तयार केले आहे. प्राथमिक शिक्षणाच्या विविध टप्प्यांवर विद्यार्थ्यांनी नेमक्या कोणत्या क्षमता प्राप्त कराव्यात हे अध्ययन–अध्यापन करताना स्पष्ट व्हावे, त्यासाठी या पाठ्यपुस्तकात भाषाविषयक अपेक्षित क्षमता विधानांचा समावेश करण्यात आला आहे.

या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील पाठ व कवितांचा समावेश पाठ्यपुस्तकात केलेला आहे. भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी नावीन्यपूर्ण स्वाध्याय, उपक्रम व प्रकल्प दिलेले आहेत. श्रवण, भाषण–संभाषण, वाचन व लेखन ही भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्यासाठी 'सुविचार', 'वाचू आणि हसू', 'वाचा', 'घोषवाक्ये', 'ओळखा पाहू', 'शब्दकोडी' यांचा समावेश केला आहे. या शीर्षकांखाली दिलेल्या मजकुरांतून विद्यार्थ्यांची निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता यांस वाव मिळणार आहे. 'आपण समजून घेऊया' या शीर्षकाखाली व्याकरण घटकांची सोप्या पद्धतीने मांडणी केली आहे. विद्यार्थ्यांनी नवीन शब्द, वाक्प्रचार व म्हणी यांचा वापर सहजतेने करावा, तसेच त्यांच्यामध्ये व्याकरणविषयक जाण निर्माण व्हावी, म्हणून हे सर्व मनोरंजक व सोप्या पद्धतीने दिले आहे. विद्यार्थ्यांना स्वत:ची कल्पकता वापरून लेखन करता यावे, विचार व्यक्त करता यावे, यांसाठी वैविध्यपूर्ण प्रश्न व कृती पाठ्यपुस्तकात समाविष्ट केल्या आहेत. पाठ्यघटक कसे हाताळावे, याबाबत शिक्षकांना मार्गदर्शनपर सूचना अनेक ठिकाणी दिल्या आहेत.

मराठी भाषा तज्ज्ञ समिती, अभ्यासगट सदस्य आणि चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमांतून हे पुस्तक तयार झाले आहे. पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पाठ्यपुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले.

मराठी भाषा तज्ज्ञ समिती, अभ्यासगट सदस्य, निमंत्रित तज्ज्ञ, संबंधित समीक्षक व चित्रकार या सर्वांचे मंडळ मन:पूर्वक आभारी आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

**(डॉ. सुनिल मगर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : ९ मे, २०१६, अक्षयतृतीया
भारतीय सौर : १९ वैशाख १९३८

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# भाषाविषयक क्षमता : द्‌वितीय भाषा मराठी

इयत्ता सहावीच्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये भाषाविषयक क्षेत्रनिहाय पुढील क्षमता विकसित व्हाव्या, अशी अपेक्षा आहे.

**क्षेत्र : श्रवण**

(१) दिलेल्या सूचना समजपूर्वक ऐकता येणे.
(२) घरी व परिसरात घडणारे अनौपचारिक संभाषण समजपूर्वक ऐकता येणे.
(३) विनोद, गाणी, कविता लक्षपूर्वक ऐकून त्यांचा आनंद घेता येणे.
(४) कविता, गाणी, कथा व इतर साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकता येणे.

**क्षेत्र : भाषण – संभाषण**

(१) कविता, गाणी तालासुरात आनंददायी पद्‌धतीने म्हणता येणे.
(२) मोठ्या माणसांच्या संवादात सहभाग घेता येणे.
(३) मित्रांसमवेत गटचर्चेत सहभागी होऊन आपले मत मांडता येणे.
(४) गोष्ट, कथा, आपले अनुभव सांगता येणे.
(५) दिलेल्या शब्दांचा, शब्दसमूहांचा व वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करता येणे.
(६) भ्रमणध्वनीद्‌वारे विषयानुरूप सुसंबद्‌ध संभाषण करता येणे.

**क्षेत्र : वाचन**

(१) योग्य गतीसह समजपूर्वक प्रकट वाचन व मूकवाचन करता येणे.
(२) पाठ्यपुस्तकातील कविता व त्या व्यतिरिक्त कवितांचे वाचन करता येणे.
(३) कथा, संवाद वाचून त्यांचा आस्वाद घेता येणे.
(४) सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचता येणे.
(५) वर्तमानपत्रे, मासिके यांतील बालसाहित्याचे समजपूर्वक वाचन करून आस्वाद घेता येणे.
(६) विनोद वाचून त्याचा आनंद घेता येणे.

**क्षेत्र : लेखन**

(१) लेखन करताना दोन शब्दांत योग्य अंतर ठेवणे.
(२) परिच्छेदाचे अचूक अनुलेखन व श्रुतलेखन करता येणे.
(३) दिलेल्या विषयावर आठ-दहा वाक्यांत लेखन करता येणे.
(४) अनुभवलेल्या प्रसंगावर लेखन करता येणे.
(५) दिलेल्या विषयावर संदेशासाठी मजकूर तयार करता येणे.
(६) चित्रवर्णन स्वत:च्या शब्दांत लिहिता येणे.

**क्षेत्र : अध्ययन कौशल्य**

(१) वाक्प्रचारांचा व म्हणींचा जीवनव्यवहारात उपयोग करता येणे.
(२) संस्कारक्षम साहित्याचे वाचन करून आवडलेल्या साहित्याचा संग्रह करणे.
(३) सुविचार, संदेश, कथा परिपाठात सादर करता येणे.

**क्षेत्र : भाषाभ्यास**

(१) शब्दकोडी सोडवता येणे.
(२) वाक्यांतील नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद व काळांचे मुख्य प्रकार ओळखता येणे, त्यांचा वाक्यांत उपयोग करता येणे.
(३) शेवट समान असणारे शब्द लिहिता येणे.
(४) दिलेल्या शब्दांचे लिंग, वचन ओळखता येणे, बदलता येणे.
(५) उद्‌गारचिन्ह, एकेरी व दुहेरी अवतरणचिन्ह यांचा उपयोग करता येणे.
(६) शुद्‌धलेखनाच्या दिलेल्या नियमांनुसार लेखन करता येणे.
(७) शब्दकोश आकारविल्हयानुसार पाहता येणे.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | भारतमाता (गाणे) | शांता शेळके | १ |
| २. | माझा अनुभव | - | २ |
| ३. | पाऊस आला! पाऊस आला! (कविता) | विंदा करंदीकर | ६ |
| ४. | माहिती घेऊया | - | ८ |
| ५. | सुगरणीचे घरटे | - | ९ |
| ६. | हे खरे खरे व्हावे... (कविता) | सुमती पवार | १२ |
| ७. | उद्यानात भेटलेला विद्यार्थी | डॉ. प्रदीप आगलावे | १५ |
| ८. | कुंदाचे साहस | - | १८ |
| ९. | घर (कविता) | धुंडिराज जोशी | २२ |
| १०. | बाबांचं पत्र | एकनाथ आव्हाड | २६ |
| ११. | मिनूचा जलप्रवास | विनया साठे | २९ |
| १२. | चंद्रावरची शाळा (कविता) | चारुता पेंढरकर | ३३ |
| १३. | मोठी आई | मालतीबाई दांडेकर | ३५ |
| १४. | अप्पाजींचे चातुर्य | विलास गिते | ३९ |
| १५. | होळी आली होळी (कविता) | दिलीप पाटील | ४३ |
| १६. | मुक्या प्राण्यांची कैफियत | ज्योती वैद्य - शेटे | ४५ |
| १७. | पाणपोई (कविता) | अय्युब पठाण लोहगावकर | ५० |
| | • आपण हे करूया ! | - | ५२ |

# १. भारतमाता

- **ऐका. म्हणा. वाचा.**

प्रियतम अमुची भारतमाता
आम्ही सारी तिची मुले,
रंग वेगळे गंध वेगळे
तरी येथली सर्व फुले ।।धृ।।

प्रिय आम्हाला येथील माती
प्रिय हे पाणी झुळझुळते,
प्रियकर ही डुलणारी शेते
प्रिय हे वारे सळसळते ।।१।।

प्रियतम आमुचा धवल हिमालय
बघे भिडाया जो गगना,
प्रियतम अमुचे सह्यविंध्य हे
प्रियतम या गंगा जमुना ।।२।।



मानव सारे समान असती
शिकवण ही जगतास दिली,
या मातेची मुले सद्गुणी
सर्व जगाला प्रिय झाली ।।३।।

प्रियतम अमुची भारतमाता
वंदन आम्ही तिला करू,
या मातेची मुले लाडकी
सदा तिचा ध्वज उंच धरू ।।४।।

**– शांता शेळके**



**शिक्षकांसाठी :** गाणे तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावे. विद्यार्थ्यांना मागून म्हणायला सांगावे. गाणी व समूहगीतांच्या ध्वनिफिती विद्यार्थ्यांना ऐकवाव्या.

# २. माझा अनुभव

वार्षिक परीक्षा संपली. मी आणि रिमा घरी आलो. घरी पोहोचताच आईने सांगितले, ''उद्या आपल्याला आगगाडीने मामाच्या गावाला जायचे आहे.'' रिमाने आनंदाने उड्या मारल्या. पायांतले पैंजण छुमछुम वाजवत ती घरभर फिरली.



मामाच्या गावाला जाण्यासाठी आम्ही सकाळी निघालो. आगगाडीत बसलो. आगगाडी झुकझुक करत चालली होती. खिडकीत बसलेल्या रिमाचे केस भुरभुर उडत होते. खिडकीतून येणाऱ्या उन्हामुळे तिचे डोळे लुकलुकत होते. तिचा चेहरा प्रसन्न दिसत होता. आई वाचत असलेल्या पुस्तकाची पाने हवेने फडफडत होती. ती वाचनात तल्लीन झाली होती. मी खिडकीतून बाहेर पाहू लागलो. थंडगार वाऱ्याच्या झुळका अंगावर झेलू लागलो.



तेवढ्यात माझे लक्ष माझ्या शेजारी बसलेल्या मावशींकडे गेले. त्यांच्या मांडीवर बसलेले छोटेसे बाळ माझ्याकडे पाहून खुदकन हसले. मी बाळाला मांडीवर घेतले. ते खिडकीतून पळणारी झाडे टुकुटुकु पाहू लागले. पाहता पाहता ते गाढ झोपले.

स्टेशनवर बैलगाडी घेऊन मामा आला होता. रिमाने पळत पळत मामाला गाठले. आम्ही बैलगाडीत बसलो. बैलांच्या गळ्यांतील घुंगूरमाळा खुळखुळ वाजत होत्या. बैलगाडीच्या चाकांचा खडखड आवाज तालात येत होता. आम्ही घराच्या रस्त्याला लागलो. तोवर सायंकाळची वेळ झाली होती. पानांची सळसळ, नदीच्या पाण्याची खळखळ ऐकू येऊ लागली. झाडीतील पक्ष्यांची किलबिल, शेतात चरणाऱ्या गाईंचे हंबरणे, बकऱ्यांचे बेंऽ बेंऽ हे सारे वातावरणात मिसळून गेले होते. शेतातली पिके वाऱ्यावर मंद मंद डुलत होती. मन आनंदाने थुईथुई नाचत होते.



घरी येताच तोंडभर हसून मामीने आमचे स्वागत केले. मामाची मुले राजू अन् चिमी आमचीच वाट पाहत होती. आम्ही एकमेकांना कडकडून भेटलो. आजी हळूहळू चालत, काठी टेकवत टेकवत आमच्याजवळ आली. आम्ही आजीला बिलगलो. तिने आम्हांला जवळ घेतले. आमच्या डोक्यावरून, तोंडावरून हात फिरवला. तिच्या हाताचा थरथरणारा स्पर्श खूप प्रेमळ अन् बोलका होता. आम्हांला खूप गहिवरून आले.

दुसऱ्या दिवसापासून नुसती धमाल. विहिरीवर पोहायला जाणे, शेतात बागडणे, आंब्याच्या झाडावर चढून कैऱ्या, पाडाचा आंबा तोडून खाणे, बैलगाडीतून मामाबरोबर फेरफटका मारणे, आज शेतावर, तर उद्या आमराईत मामाबरोबर फिरायला जाणे, रोज मजाच मजा.

आमची सुट्टी कधी संपली, ते आम्हांला समजलेच नाही. आम्ही परत गावी आलो.

---

**शब्दार्थ :** **लुकलुकणे** – चमकणे. **तल्लीन होणे** – दंग होणे, गुंग होणे. **कडकडून भेटणे** – प्रेमाने मिठी मारणे. **बिलगणे** – प्रेमाने जवळ येणे. **गहिवरून येणे** – मन भरून येणे. **धमाल** – मजा. **पाडाचा आंबा** – अर्धवट पिकलेला आंबा. **आमराई** – आंब्याच्या झाडांची बाग.

## स्वाध्याय



**प्र. १. का ते लिहा.**

(अ) रिमाने आनंदाने उड्या मारल्या.
(आ) मुलाने बाळाला मांडीवर घेतले.
(इ) मुलाचे मन आनंदाने थुईथुई नाचू लागले.
(ई) मुलांना गहिवरून आले.

**प्र. २. 'सुट्टी कधी संपली, ते आम्हांला समजलेच नाही.' असे मुलाला का वाटले? तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र. ३. वाचा. सांगा. लिहा.**

(अ) नादमय शब्द

उदा., छुमछुम, झुकझुक.

**प्र. ४. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

(अ) वारा (आ) तोंड (इ) रस्ता (ई) आई (उ) शेत

**प्र. ५. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) आगगाडी | (१) खुळखुळ |
| (आ) पैंजण | (२) खडखड |
| (इ) घुंगूरमाळा | (३) झुकझुक |
| (ई) बैलगाडी | (४) खळखळ |
| (उ) पाणी | (५) छुमछुम |

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना त्यांनी अनुभवलेल्या विविध प्रसंगांचे कथन करण्यास प्रवृत्त करावे, प्रोत्साहन द्यावे.

**प्र. ६. 'गाईचे हंबरणे' तसे खालील पशुपक्ष्यांचे आवाजदर्शक शब्द लिहा.**

(अ) बकरी–
(आ) वाघ–
(इ) बेडूक–
(ई) कुत्रा–
(उ) मांजर–
(ऊ) मोर–

**प्र. ७. खालील वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करा.**

(अ) खुदकन हसणे.
(आ) गाढ झोपणे.
(इ) कडकडून भेटणे.
(ई) टुकुटुकु पाहणे.
(उ) आनंदाने थुईथुई नाचणे.
(ऊ) गहिवरून येणे.

**प्र. ८. 'बाजारहाट' यासारखे आणखी काही जोडशब्द लिहा.**

**प्र. ९. तुम्ही एखादे चांगले काम केले आहे, त्या प्रसंगाचे अनुभवलेखन करा.**

**प्र. १०. तुमच्या घरातील व्यक्तींबरोबर सुट्टीच्या दिवशी तुम्ही कशी मजा करता ते लिहा.**

**प्र. ११. खालील शब्दांसारखे दोन–दोन शब्द लिहा.**

(अ) सळसळ (आ) भुरभुर (इ) लुकलुक (ई) खडखड

**प्र. १२. हे शब्द असेच लिहा.**

उद्या, उन्हाने, तल्लीन, स्टेशन, स्वागत, वाऱ्यांच्या, तेवढ्यात, येणाऱ्या, रस्त्याला, कोंबड्यांचा, स्पर्श, प्रेमळ, दुसऱ्या, कैऱ्या, सुट्टी, आंब्याच्या.

**प्र. १३ खालील शब्द आपण कधी वापरतो?**

कृपया, माफ करा, आभारी आहे.

- **आपण एका वस्तूबद्दल बोलू लागलो, की त्यास एकवचन म्हणतो आणि अनेकांबद्दल बोलू लागलो, की त्यास अनेकवचन म्हणतो.** उदा., एक झाड – अनेक झाडे.

**खालील शब्दांच्या जोड्या वाचा व समजून घ्या.**

| अ.क्र | एकवचन | अनेकवचन | अ.क्र | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|---|---|
| (१) | छत्री | छत्र्या | (४) | अंगठी | अंगठ्या |
| (२) | डोळा | डोळे | (५) | बांगडी | बांगड्या |
| (३) | पाटी | पाट्या | (६) | पुस्तक | पुस्तके |

- **खालील वाक्यांतील नामांना अधोरेखित करा.**

(अ) बाबांचा सदरा उसवला.
(आ) सुमनने गुलाबाचे रोपटे लावले.
(इ) पाकिटात पैसे नव्हते.
(ई) मुले बागेत खेळत होती.
(उ) समोरून बैल येत होता.
(ऊ) सरिता व फरिदा चांगल्या मैत्रिणी आहेत.
(ए) पंकजने परीक्षेत पहिला नंबर मिळवला.

**सुविचार**

मन प्रसन्न असेल, तर कामात उत्साह येतो व काम झटपट होते.

मनापासून व एकाग्रतेने काम केले, की जीवनात यश हमखास मिळते.

चांगले पेराल तर चांगले उगवेल हे विसरता कामा नये, कारण ते जीवनाचे सूत्र आहे.

अधिक मित्र हवे असतील, तर दुसऱ्यांच्या गुणांचे मनापासून कौतुक करा.

**सूचनाफलक**

तिकिटाएवढेच पैसे वाहकास द्यावे, तिकीट मागून घ्यावे.

स्त्रिया व अपंग यांच्यासाठी राखीव ठेवलेल्या जागेवर बसू नये.

स्पीड ब्रेकरकडे करू नका दुर्लक्ष, अपघात होऊ नये, म्हणून द्या सदैव लक्ष.

वाहन चालवताना मोबाइलचा वापर नेहमी टाळा.

**वाचा.**

काल सकाळी सहाच्या सुमारास मी बाबांबरोबर फिरायला गेलो होतो. पूर्वेकडून सूर्य वर येत होता. सूर्याची ती लालसर पिवळी किरणे किती वेगळी व छान दिसत होती! त्यांच्याकडे मी वारंवार पाहत होतो. सकाळचा तो गारवा किती छान वाटत होता. रस्त्यातल्या झाडांवर वेगवेगळे पक्षी बसलेले होते. त्यांचे वेगवेगळे आवाज कानांवर पडत होते. बाबा खूपच भरभर चालत होते. चालता चालता मी मात्र दमलो होतो. बाबांना मी थांबायला सांगितले. आम्ही एका ठिकाणी बसलो. बाबा सकाळच्या मोकळ्या व शुद्ध हवेविषयी मला सांगत होते. खरंच त्या शुद्ध व मोकळ्या हवेचा अनुभव मला येत होता. मला प्रसन्न व ताजेतवाने झाल्यासारखे वाटत होते. रोज सकाळी लवकर उठण्याचा आणि फिरायला जाण्याचा अनुभव तुम्हीपण घ्या. तुम्हांलाही छान वाटेल.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या सामाजिक समस्यांवर आधारित घोषवाक्ये, सूचनाफलक, सुविचार तयार करून वर्गात तसेच शाळेच्या परिसरात लावावे. विद्यार्थ्यांकडून उताऱ्याचे अनुलेखन करून घ्यावे.

# ३. पाऊस आला! पाऊस आला!

● ऐका. म्हणा. वाचा.



पाऊस आला! पाऊस आला!
ऐन दुपारी विजा चमकल्या
कडाड कडकड भणाण वारा
जिकडे तिकडे गारा, गारा.

पाऊस आला! पाऊस आला!
दिवाळीतला खचला किल्ला
भुंकत सुटली सगळी कुत्री
आजोबांनी शिवली छत्री!



पाऊस आला! पाऊस आला!
'उशीर, त्यातच हा घोटाळा',
बाबा गेले करीत चडफड
आईचेही भिजले पापड.



पाऊस आला! पाऊस आला!
आम्ही केला एकच गिल्ला
हसत म्हणाल्या मॅडम कुट्टी
'चला पळा, शाळेला सुट्टी!'

**– विंदा करंदीकर**

---

**शब्दार्थ :** **ऐन दुपारी** – भर दुपारी. **भणाण वारा** – वाऱ्याचा भयभीत करणारा आवाज. **खचणे** – खाली खाली जाणे, ढासळणे. **चडफड**– राग. **गिल्ला करणे** – गोंधळ करणे.

## स्वाध्याय



**प्र. १. एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) विजा केव्हा चमकल्या?
(आ) सुटलेला वारा कसा होता?
(इ) पाऊस आल्यामुळे आजोबांनी काय केले?
(ई) आलेल्या पावसामुळे बाबांनी चडफड का केली?
(उ) पावसामुळे आईचे कोणते नुकसान झाले?

**प्र. २. (अ) शब्दातील शेवटचे अक्षर सारखे येणारे शब्द कवितेतून शोधा व लिहा.**

उदा., वारा–गारा

(अ) कुत्री (आ) गिल्ला (इ) पापड (ई) पळा (उ) कुट्टी

**(आ) कडकड, चडफड, तडफड यांसारखे आणखी शब्द तयार करा.**

**प्र. ३. खालील शब्दांचे वचन बदला.**

(अ) माणूस (आ) गाय (इ) दप्तर (ई) पाणी (उ) वह्या (ऊ) पत्र

**प्र. ४. अचानक आलेल्या पावसामुळे तुमची कधी फजिती झाली आहे का? तो प्रसंग वर्गात सांगा.**

**प्र. ५. अचानक आलेल्या पावसामुळे दिवाळीत तुम्ही केलेल्या तयारीचे कोणकोणते नुकसान होते ते चार–पाच वाक्यांत लिहा.**

**प्र. ६. सुरुवातीला एक वाक्य दिले आहे. तुमच्या मनाने पुढील वाक्ये लिहा.**

(अ) रिमझिम पाऊस पडत होता.

(आ) रिक्षा खडखड करत थांबली.

**प्र. ७. 'वारा' या शब्दाशी संबंधित आलेले शब्द वाचा. त्यांचा वाक्यांत उपयोग करा.**

उदा., भणाणणारा वारा सुटला होता.

**वारा**

मंद मंद | गिरक्या | जोरदार | थंडगार | झोंबणारा

**प्र. ८. पापड कशाकशापासून बनवले जातात याची माहिती आईला विचारून लिहा.**

**प्र. ९. उन्हाळ्यामध्ये वाळवून साठवण्याचे कोणकोणते पदार्थ आई करते ते लिहा.**

**उदा., पापड.**

**प्र. १०. पावसाळा सुरू होताच तुम्ही पावसापासून बचाव करण्यासाठी कोणकोणती पूर्वतयारी करता?**


**उदा., छत्री खरेदी करणे.**

**उपक्रम :** (१) पावसाची गाणी मिळवा. वर्गात सादर करा.

(२) 'पावसाळ्यातील एक दृश्य' निसर्गचित्र काढा व रंगवा.

**शिक्षकांसाठी :** पाठ्यपुस्तकातील सर्व कवितांचे विद्यार्थ्यांकडून तालासुरात, साभिनय सादरीकरण करून घ्यावे.

# ४. माहिती घेऊया



पाऊस केव्हा पडेल? किती पडेल? याची देशभर चिंता असते. ही चिंता दूर करण्यासाठी ज्या संशोधकाने मान्सूनच्या अंदाजाची नवी पद्धत शोधून काढली त्यांचे नाव डॉ. वसंत गोवारीकर.

डॉ. वसंत गोवारीकरांचा जन्म २५ मार्च १९३३ रोजी पुण्यात झाला. शाळेत असताना त्यांना नवनव्या कल्पना सुचायच्या. एकदा त्यांना वाटले आपण मोटार बनवावी. अवघे तेरा वर्षांचे असताना डॉ. गोवारीकर यांनी थेट अमेरिकेतील हेन्री फोर्डला पत्र लिहून आपली इच्छा कळवली. हेन्री फोर्डला मराठी कळणार नाही, म्हणून त्यांनी मित्राची मदत घेऊन मराठीत लिहिलेल्या पत्राचे इंग्रजी भाषांतर केले. हेन्री फोर्डने डॉ. गोवारीकर यांच्या पत्राची दखल घेऊन उत्तरही पाठवले. त्यासोबत काही पुस्तकेही पाठवली. त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेची आणि दृढ संकल्पाची चुणूक लहानपणीच दिसून आली.

कोल्हापूरला पदवीपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले. बर्मिंगहॅम विद्यापीठात त्यांनी 'रासायनिक अभियांत्रिकी' विषयात संशोधन केले. पुढे इंग्लंडच्या ऊर्जा संशोधन केंद्रात संशोधक म्हणून त्यांनी काम केले.

विक्रम साराभाई यांच्या आग्रहामुळे १९६७ साली ते भारताच्या अवकाश संशोधन केंद्रात रुजू झाले. 'घन पदार्थातील ऊर्जा' या विषयाच्या संशोधनासाठी त्यांच्या पुढाकाराने नवा प्रकल्प सुरू करण्यात आला. भारताच्या विज्ञान क्षेत्रात त्यांनी केलेली कामगिरी फार मोठी आहे. अग्निबाणाच्या मोटारीकरिता घन इंधन बनवण्याचे तंत्र त्यांनी विकसित केले.

## स्वाध्याय



**प्र. १. भारतीय संशोधकांची नावे व त्यांनी लावलेले शोध यांची माहिती घेऊन तक्ता तयार करा. वर्गात लावा.**

**प्र. २. कोणकोणत्या गोष्टींमध्ये संशोधन व्हावे असे तुम्हांला वाटते? विचार करा व लिहा.**

**प्र. ३. खालील वाक्यांचे वचन बदलून वाक्ये पुन्हा लिहा.**

उदा., भिंत कोसळली – भिंती कोसळल्या.

| | | |
|---|---|---|
| (१) | मला कविता आठवली. | |
| (२) | त्याने खुर्ची ठेवली. | |
| (३) | मधू आंबा खा. | |

**उपक्रम :** आंतरजालाचा उपयोग करून डॉ. वसंत गोवारीकर यांची माहिती मिळवा. कोलाज तयार करा.

**प्रकल्प :** वर्तमानपत्रात शास्त्रज्ञ, संशोधक यांच्याविषयी येणाऱ्या माहितींची कात्रणे काढून चिकटवही बनवा.

# ५. सुगरणीचे घरटे



शाळेच्या परिसरात असलेल्या निंबाच्या झाडावर सुगरण पक्षी घरटे बांधत होता. अतुल, नयना, जॉन व सिमरन रोज तेथे थोडावेळ थांबायचे. सुगरण पक्षी कसे घरटे बांधतो याचे निरीक्षण करायचे. त्याच्या हालचाली त्यांचे मन मोहून टाकायच्या. 'कुठे घाई नाही, गडबड नाही, सगळे कसे नियोजनबद्ध.' असे नयना नेहमी म्हणायची. तिला त्याच्या कामातला सफाईदारपणा, नीटनेटकेपणा आवडायचा. जॉनला त्याची चिकाटी तर अतुलला त्याची कष्टाळूवृत्ती भावून जायची. सिमरनला वाटायचे, 'किती मेहनती आहे हा पक्षी! आपल्या सुगरणीसाठी व पिलांसाठी एवढे सुरेख घरटे बांधतो. त्यासाठी अपार मेहनत घेतो. खरंच खूपच जबाबदार व कुटुंबवत्सल पक्षी आहे हा !'

मुले घरटे पाहत असताना गुरुजी तिथे आले. गुरुजींनी मुलांना विचारले, ''काय रे मुलांनो, काय पाहत आहात?'' मुलांनी घरट्याकडे बोट दाखवले अन् म्हणाले, ''गुरुजी, पाहा ना! सुगरण पक्ष्याने किती छान घरटे बांधले आहे.'' गुरुजींनी घरट्याकडे पाहिले. ते मुलांना म्हणाले, ''मुलांनो, सुगरण पक्षी नीटनेटके आणि मजबूत घरटे बांधतो. गवताच्या बारीक पण चिवट काड्या गोळा करतो आणि आपल्या चोचीने सुबक व भारी घरटे विणतो. नक्षीदार वीण पाहूनच या पक्ष्याला 'सुगरण' असे म्हणतात. अशी सुबक आकाराची सुरेख घरटी तो बांधत असतो. सुगरणमादी त्याचे निरीक्षण करते. राहण्यास योग्य व मजबूत असेल अशा घरात राहणे ती पसंत करते. निंब, बाभळीच्या झाडाच्या फांदीला हे घरटे झोक्यासारखे टांगलेले असते. वादळातही हे घरटे शाबूत राहते. त्याच्या घरट्याची सर कोणत्याही इतर पक्ष्याच्या घरट्याला येत नाही. गुरुजींनी सुगरण पक्ष्याची वाखाणणी केली.

बऱ्याच दिवसांनी पुन्हा मुले निंबाच्या झाडाजवळ आली. पाहतात तर काय सुगरण पक्ष्याचे घरटे बांधून पूर्ण झाले होते. झाडाच्या फांदीवर बसून घरट्याचे निरीक्षण करणारी सुगरण त्यात राहायला आली होती. नयना म्हणाली, ''सुगरण पक्षी किती आकारबद्ध घरटे बांधतो, तेही चोचीने. आपल्याला असे घरटे तयार करता येईल का? किती कसबी विणकर आहे हा पक्षी!''

---

**शब्दार्थ : मजबूत** – पक्के. **सुबक** – सुंदर. **शाबूत राहणे** – टिकून राहणे. **सर येणे** – बरोबरी करणे. **वाखाणणे** – स्तुती करणे. **कसब** – कौशल्य. **विणकाम** – धागे एकमेकांत गुंफून विणण्याचे काम.

## स्वाध्याय



**प्र. १. एक–दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) सुगरण पक्षी घरटे कशापासून बनवतो ?
(आ) सुगरण पक्षी घरटे कुठे बांधतो ?
(इ) सुगरण पक्ष्याचा महत्त्वाचा गुण कोणता ?

**प्र. २. एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सुगरण पक्षी सुबक वीण कशाने घालतो ?
(आ) सुगरण पक्ष्याचे हे घरटे वादळात शाबूत का राहते ?
(इ) नयना सुगरण पक्ष्याबद्दल काय म्हणाली ?
(ई) सुगरण पक्षी कुटुंबवत्सल कसा ? ते लिहा.
(उ) सुगरण पक्ष्याला कसबी विणकर का म्हटले आहे ?

**प्र. ३. वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावा.**

| अ.क्र | 'अ' गट | अ.क्र | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (अ) | शाबूत राहणे | (१) | बरोबरी करणे |
| (आ) | वाखाणणे | (२) | टिकून राहणे |
| (इ) | सर येणे | (३) | स्तुती करणे |

**प्र. ४. खालील शब्दांचा वाक्यांत उपयोग करा.**


(अ) सुबक (आ) कसब (इ) चिकाटी (ई) मजबूत

**प्र. ५. तुम्हांला या पाठातून काय शिकायला मिळाले ते लिहा.**

**प्र. ६. तुम्ही सुगरण पक्ष्याचे घरटे पाहिले आहे का ? त्याचा आकार तुम्हांला कसा वाटला ? त्याचे वर्णन करा.**

**प्र. ७. खाली काही शब्द दिलेले आहेत, त्यांपैकी सुगरण पक्ष्याला लागू होणारे शब्द शोधून आकृती पूर्ण करा.**

नीटनेटकी, चिकाटी, आळशी, जबाबदार, सहनशील, कष्टाळू, स्तुतीप्रिय, निर्दयी, झोपाळू.




**प्र. ८. सुगरण पक्ष्याप्रमाणे तुमच्यात जर चिकाटी असेल, तर कोणकोणती कामे तुम्ही चांगली करू शकाल ते सांगा.**

**उपक्रम : तुम्ही पाहिलेले पक्षी व त्यांची घरटी यांची चित्रे गोळा करून एका मोठ्या कागदावर चिकटवा. त्याखाली त्यांची नावे लिहून तक्ता तयार करा.**

- **खालील वाक्ये वाचा.**

| | | |
|---|---|---|
| तो फळा | ती वही | ते फळ |

जेव्हा आपण एखाद्या शब्दाच्या आधी '**तो**' लावतो तेव्हा तो पुल्लिंगी शब्द, '**ती**' लावतो तेव्हा स्त्रीलिंगी शब्द, '**ते**' लावतो तेव्हा नपुंसकलिंगी शब्द म्हणतो.

आणखी काही उदाहरणे वाचा. वाक्ये लिहिताना त्याप्रमाणे लिहा.

| | | |
|---|---|---|
| तो वाडा | ती इमारत | ते घर |
| तो भात | ती भाकरी | ते पेन |

**आपण समजून घेऊया.**

मीना हुशार मुलगी आहे. मीनाच्या भावाचे नाव मिहीर आहे. मीना मिहीरला 'दादा' म्हणते. मिहीर मीनाला 'ताई' म्हणतो. मीना आणि मिहीर एकाच शाळेत शिकतात. मीना आणि मिहीर यांच्यात कधीच भांडणे होत नाहीत. मीना मोठी असल्याने मीना मिहीरची काळजी घेते.

वरील परिच्छेदात मीना आणि मिहीर या भावंडांचे वर्णन आले आहे. मीना व मिहीर या शब्दांऐवजी दुसरे शब्द वापरून तयार केलेला पुढील परिच्छेद वाचा.

मीना हुशार मुलगी आहे. तिच्या भावाचे नाव मिहीर आहे. ती त्याला 'दादा' म्हणते. तो तिला 'ताई' म्हणतो. ते एकाच शाळेत शिकतात. त्यांच्यामध्ये कधीच भांडणे होत नाहीत. ती मोठी असल्याने त्याची काळजी घेते.

मीना आणि मिहीर या नामांऐवजी आपण येथे **तिच्या, ती, त्याला, तो, तिला, ते, त्यांच्या, ती, त्याची** असे शब्द वापरले आहेत.

**या शब्दांना सर्वनाम म्हणतात. नामाऐवजी आपण जो शब्द वापरतो, त्या शब्दास सर्वनाम म्हणतात.**

- **खालील वाक्यांतील सर्वनामे अधोरेखित करा.**

(अ) मी कुमारला हाक मारली.

(आ) तुला नवीन दप्तर आणले.

(इ) त्याचा फोटो छान येतो.

(ई) मी त्यांना सुविचार सांगितला.

(उ) त्याने घर झाडून घेतले.

(ऊ) आपण पतंग उडवूया.

- **खालील परिच्छेद वाचा व त्यातील सर्वनामे अधोरेखित करा.**

सलीम नुकताच शाळेत दाखल झाला होता. त्याला शाळेत करमत नव्हते. तो त्याच्या आईबरोबर शाळेत यायचा. तेवढ्यात त्याला त्याची मैत्रीण दिसली. सलीम त्याच्या आईला म्हणाला, ''तू जा. मी आज तिच्याबरोबर घरी येईन.''

# ६. हे खरे खरे व्हावे...



- ऐका. म्हणा. वाचा.

हवेवरी त्या होत स्वार मी
अवकाशी विहरावे,
मनात माझ्या नेहमी येते
मी पक्षी व्हावे...

दवबिंदू होऊनी पहाटे
गवतावर उतरावे,
सूर्यप्रकाशे वाफ होऊनी
पुन्हा पुन्हा परतावे...

क्षितिजावरचे गडद रंग मी
ढग होऊनी झुलावे,
भरारणारा होऊन वारा
चंद्राशी खेळावे...

धुक्यापरी मी अलगद अलगद
धरणीवर उतरावे,
अवघे जग झाकूनी तयाला
मिष्किलतेने पहावे...

उर्जेचा तो स्रोत सूर्य मी
अगदी जवळून पहावा,
काळोखाला चिरत चिरत मी
सूर्य किरण व्हावा...

निसर्गातल्या रंगामध्ये
मी रंगून जावे,
भास नको मज, तुम्हा सांगतो
हे खरे खरे व्हावे...

**– सुमती पवार**





**शब्दार्थ :** **स्वार होणे** – आरूढ होणे, बसणे. **विहरणे** – आकाशात उडणे, फिरणे. **क्षितिज** – आकाश जेथे जमिनीला टेकल्यासारखा भास होतो ते ठिकाण. **भरारणारा** – वेगाने वाहणारा. **अलगद** – हळूच. **मिष्कील** – खोडकर. **स्रोत** – ज्यापासून मिळते तो मार्ग. **काळोखाला चिरणे** – काळोख भेदून जाणे. **भास** – भ्रम.

## स्वाध्याय



**प्र. १. एका–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कवयित्रीला अवकाशात कसे फिरावेसे वाटते?
(आ) कवयित्रीला गवतावर कसे उतरावेसे वाटते?
(इ) धुके बनून कवयित्रीला काय करावेसे वाटते?
(ई) कवयित्रीला सूर्यकिरण का व्हावेसे वाटते?

**प्र. २. खालील कल्पनेचा योग्य अर्थ शोधा.**

(अ) सूर्यप्रकाशे वाफ होऊनी पुन्हा पुन्हा परतावे.
  (१) सूर्यकिरणांची वाफ व्हावी.
  (२) सूर्याच्या उष्णतेने वाफ बनावी.
  (३) सूर्याच्या उष्णतेने वाफ बनून पुन्हा दवबिंदू बनावा.
(आ) भास नको मज, तुम्हा सांगतो हे खरे खरे व्हावे.
  (१) निसर्गातल्या रंगात रंगून जावे.
  (२) वर्णन केलेल्या कल्पना प्रत्यक्षात याव्यात.
  (३) कोणतीच गोष्ट भासमान नसावी.

**प्र. ३. कवितेतून शोधा. उदा., चंद्राशी खेळणारा–भरारणारा वारा**

(अ) अवकाशी विहरणारा – [    ]    (ई) ऊर्जेचा स्रोत असणारा – [    ]
(आ) गवतावर उतरणारे – [    ]    (उ) काळोखाला चिरणारा – [    ]
(इ) धरणीवर उतरणारे – [    ]

**प्र. ४. 'खरे–खोटे' याप्रमाणे काही विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या लिहा.**

[खरे] ⟷ [खोटे] , [    ] ⟷ [    ] , [    ] ⟷ [    ]

**प्र. ५. 'मी झाड झाले तर...' अशी कल्पना करून पाच ते सहा वाक्ये लिहा.**

**प्र. ६. हे शब्द असेच लिहा.**


क्षितिज, ऊर्जा, मिष्किल, स्रोत, स्वार, सूर्यप्रकाश, चंद्र, निसर्ग, पुन्हा.

**प्र. ७. 'झुळूक मी व्हावे' कवी दा.अ. कारे यांची कविता मिळवून, त्या कवितेचे वर्गात वाचन करा.**


**प्र. ८. ढगांचे विविध आकार काढा. त्यांना रंग द्या व त्यांत कवितेचे एकेक कडवे सुंदर अक्षरांत लिहा.**

**प्र. ९. कवयित्रीला जशी अनेक रूपे घ्यावीशी वाटतात, तसे तुम्हांला कोण कोण व्हावेसे वाटते ते लिहा.**

**प्र. १०.खालील चित्र पाहा. चित्राचे वर्णन करा.**



**प्र. ११.खालील वेळेला सूर्याचा रंग कसा दिसतो त्याचे निरीक्षण करा. लिहा.**




**उपक्रम :** तुमच्या कल्पनेने या कवितेचे वर्णन करणारे निसर्गचित्र काढा व रंगवा.

- **खालील वाक्यांत कंसातील योग्य सर्वनामे घाला.**

(आपण, ती, त्यांनी, स्वत:)

(अ) हसिना खेळाडू आहे. ................ रोज पटांगणावर खेळते.

(आ) बाईंनी मुलांना खाऊ वाटला. ................ मुलांशी गप्पा मारल्या.

(इ) घरातील सगळे म्हणाले, '................ सिनेमाला जाऊ.'

(ई) जॉनने ................ चहा केला.

- **खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य सर्वनामे लिहा.**

(अ) ................ गावाला जा. (तुम्ही, आपण, आम्ही)

(आ) आईने ................ डबा भरून दिला. (त्याने, तिचा, आपण)

(इ) आज ................ खूप मजा केली. (ती, स्वत:, आम्ही)

(ई) दादा धावपटू आहे. ................ रोज पळतो. (तो, ती, त्या)

(उ) ................ बाळाला मांडीवर घेतले. (तिला, तिने, तिचा)

(ऊ) मोत्याने धावत येऊन ................ स्वागत केले. (आम्हांला, आपण, आमचे)

# ७. उद्यानात भेटलेला विद्यार्थी



मुंबईचे चर्नी रोड उद्यान! चर्नी रोड उद्यानात सायंकाळच्या वेळी अनेक नागरिक फिरायला यायचे. मुंबई येथील विल्सन हायस्कूलचे मुख्याध्यापक आणि विद्याव्यासंगी लेखक कृष्णाजी अर्जुन केळूस्कर गुरुजीदेखील चर्नी रोड उद्यानात रोज सायंकाळी ५.३० वाजता यायचे. उद्यानाच्या एका बाकावर बसून ते सोबत आणलेल्या पुस्तकाचे वाचन करत असत.

बाकावर बसून वाचन करणाऱ्या कृष्णाजी केळूस्कर गुरुजींच्या लक्षात आले, की थोड्या अंतरावर एक विद्यार्थी पुस्तक वाचत आहे. त्या वेळी त्यांनी त्या विद्यार्थ्याकडे फारसे लक्ष दिले नाही. दुसऱ्या दिवशी तो कालचा विद्यार्थी तेथे पुस्तक वाचताना त्यांना दिसला. आता मात्र त्यांच्या मनात कुतूहल निर्माण झाले. तिसऱ्या दिवशीदेखील तोच विद्यार्थी कोणतेतरी पुस्तक वाचताना दिसला. त्या विद्यार्थ्यानेदखील गुरुजींकडे बघितले, कुणीच काही बोलले नाही.

केळूस्कर गुरुजी त्या मुलाजवळ आले. तो मुलगा वाचत होता. कुणीतरी आपल्याजवळ उभे आहे, असे त्या मुलाच्या लक्षात आल्याबरोबर त्याने गुरुजींकडे बघितले. गुरुजींनी अतिशय आपुलकीने त्याला विचारले, ''बाळ तुझं नाव काय?''

''माझं नाव भीमराव रामजी आंबेडकर.''

''वा! छान नाव आहे तुझं! तीन दिवसांपासून तुला रोज येथे बघतो. तू रोज काहीतरी वाचत असतोस. इतर मुलांसारखी तू मस्ती करताना दिसत नाहीस, म्हणून तुझी ओळख करून घेण्यासाठी मी तुझ्याजवळ आलोय.''

आपल्याविषयी इतक्या प्रेमाने, स्नेहाने बोलणाऱ्या त्या गृहस्थांबद्दल भीमरावला आदर वाटला. त्याने गुरुजींना नमस्कार केला. केळूस्कर गुरुजींनी विचारले, ''बाळ तू कुठं शिकतो?''

''मी एलफिन्स्टन हायस्कूल, भायखळा येथे शिकतो. शाळेतील पुस्तकांशिवाय अवांतर पुस्तके वाचण्याची मला आवड आहे, म्हणून शाळा सुटल्यानंतर इथं काही वेळ पुस्तक वाचत बसतो.'' ''वा! छान! चांगली पुस्तके वाचली पाहिजेत.'' नंतर केळूस्कर गुरुजींनी भीमरावच्या कुटुंबाविषयी चौकशी केली. ते विचार करू लागले. 'हा मुलगा इतर मुलांपेक्षा निश्चित वेगळा आहे. या मुलाला आपुलकी आणि मार्गदर्शनाची खरी गरज आहे.' थोडावेळ थांबून ते म्हणाले, ''मी विचार करत होतो, की पद्धतशीरपणे वाचन कसे करायचे हे तुला सांगावे!'' ''सांगा ना गुरुजी!'' आतुरतेने भीमरावने विचारले.

गुरुजींनी भीमरावला वाचन कसे करावे, याविषयी माहिती दिली आणि सांगितले, ''मी काही लेखकांची पुस्तके तुला वाचायला देईन.'' ''जरूर द्या गुरुजी! मला ती पुस्तके वाचायला आवडतील!'' गुरुजींनी मोठ्या मायेने भीमरावच्या डोक्यावरून हात फिरवला. भीमरावला खूप बरे वाटले.

चर्नी रोड उद्यानामध्ये केळूस्कर गुरुजींची भीमरावशी रोज भेट होऊ लागली. गुरुजी त्याला चांगल्या लेखकांची पुस्तके वाचायला देऊ लागले; त्यामुळे भीमरावच्या विस्तृत वाचनाला सुरुवात झाली. आता केळूस्कर गुरुजी आणि भीमराव यांची अभेद्य गट्टी जमली होती.

केळूस्कर गुरुजींनी भीमरावची तल्लख बुद्धिमत्ता लक्षात घेऊन महाविद्यालयीन आणि पुढे उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत पाठवण्यासाठी सयाजीराव गायकवाडमहाराजांकडे स्वतः शिफारस केली; त्यामुळेच भीमराव यांना महाविद्यालयीन आणि उच्च

शिक्षण घेण्याची संधी मिळाली. आपल्याला मिळालेल्या संधीचे सोने करून भीमराव जगातील एक विद्‌वान म्हणून नावलौकिक प्राप्त करणारे उच्च विद्याविभूषित डॉ. बाबासाहेब आंबेडकर झाले! अशा या उच्च विद्याविभूषित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहिली.

**– डॉ. प्रदीप आगलावे**

---

**शब्दार्थ : कुतूहल निर्माण होणे** – जिज्ञासा निर्माण होणे. **विस्तृत** – अफाट, विस्तीर्ण. **तल्लख** – तीक्ष्ण, कुशाग्र.

## स्वाध्याय



**प्र. १. एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) चर्नी रोड उद्यानात केळूस्कर गुरुजी कशासाठी येत?

(आ) उद्यानात गुरुजींचे कोणाकडे लक्ष गेले?

(इ) गुरुजींना उद्यानात वाचन करत बसलेल्या विद्यार्थ्याची विचारपूस करावी असे का वाटले?

(ई) केळूस्कर गुरुजींची व डॉ. आंबेडकरांची गट्टी का जमली?

(उ) डॉ. आंबेडकरांनी कोणता नावलौकिक मिळवला?

**प्र. २. खालील वाक्ये कोण, कोणास व का म्हणाले ते लिहा.**

(अ) ''बाळ तुझं नाव काय?''

(आ) ''चांगली पुस्तके वाचली पाहिजेत.''

(इ) ''मला ती पुस्तके वाचायला आवडतील!''

**प्र. ३. असे का घडले? ते लिहा.**

(अ) केळूस्कर गुरुजींच्या मनात उद्यानात वाचत बसलेल्या विद्यार्थ्याबाबत कुतूहल निर्माण झाले.

(आ) भीमराव उद्यानात वाचत बसायचे.

(इ) गुरुजी व भीमराव यांच्यात गट्टी जमली.

(ई) गुरुजींनी भीमरावच्या डोक्यावरून हात फिरवला.

(उ) गुरुजींनी भीमरावच्या उच्च शिक्षणासाठी शिफारस केली.

**प्र. ४. पाठातील खालील घटना योग्य क्रमाने लिहा.**

(अ) गुरुजी व भीमराव यांच्यात गट्टी जमली.

(आ) गुरुजींनी विद्यार्थ्याकडे फारसे लक्ष दिले नाही.

(इ) त्या विद्यार्थ्यानेदेखील गुरुजींकडे बघितले.

(ई) डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहिली.

(उ) गुरुजींनी भीमरावला वाचन कसे करावे याविषयी माहिती दिली.

(ऊ) गुरुजी मुलाजवळ आले.

**प्र. ५. खालील शब्दांत लपलेले शब्द शोधा व लिहा.**

उदा., वाचनाला - वाचन, नाच, नाला, लावा, चना.

(अ) तुझ्याजवळ (आ) दिवसापासून (इ) मार्गदर्शन (ई) आवडतील

**प्र. ६. खालील शब्दांचे वचन बदला.**

(अ) लेखक (आ) पुस्तक (इ) शाळा (ई) भेट (उ) शिफारस (ऊ) शब्द

**प्र. ७. आंतरजालावरून खालील मुद्द्यांच्या आधारे डॉ. आंबेडकर यांची माहिती मिळवा व लिहा.**

(अ) पूर्ण नाव (आ) जन्म स्थळ (इ) जन्म दिनांक (ई) आई - वडिलांचे नाव

(उ) शिक्षण (ऊ) लिहिलेली पुस्तके (ए) कार्य

**प्र. ८. खालील शब्द शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.**

(अ) शब्द - सुशब्द, अपशब्द.

(आ) स्पष्ट - सुस्पष्ट, अस्पष्ट.

(इ) बुद्धी - सुबुद्धी, बुद्धिमत्ता, बुद्धिमान, निर्बुद्ध, दुर्बुद्धी

**प्र. ९. खालील शब्द असेच लिहा.**

उद्यान, हायस्कूल, मुख्याध्यापक, विद्याव्यासंगी, विद्यार्थी, तिसऱ्या, दुसऱ्या, सर्वसामान्य, निश्चित, मार्गदर्शन, पद्धतशीर, विस्तृत, अभेद्य, गट्टी, तल्लख, बुद्धिमत्ता, महाविद्यालयीन, शिक्षण, स्वतः, विद्वान, प्राप्त, व्रात्य, विद्याविभूषित, उच्च, स्वतंत्र.

**उपक्रम :** वेगवेगळ्या वृत्तपत्रांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी आलेल्या माहितीची कात्रणे गोळा करा व वहीत चिकटवा. त्याचे वाचन करा.

**सांगा पाहू.**

कधी हातावर, कधी भिंतीवर
जाऊन मी बसतो,
तीन हात माझे सतत
फिरवत मी असतो,
वेळ वाया घालवू नका
असा नेहमी उपदेश करतो.

शिस्तीचे धडे
उत्तम गडे,
कणकण शोधते
कधीच न रडे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून पाठाचे प्रकट वाचन व मूकवाचन करून घ्यावे.

# ८. कुंदाचे साहस

पावसाळ्याचे दिवस होते. झाडे, शेते सर्वच हिरवीगार झाली होती. सर्वत्र प्रसन्न वातावरण होते. गावातल्या सोना नदीला भरपूर पाणी आले होते. पावसामुळे नदीचा प्रवाह वाढत होता.

आज रविवार. कुंदाच्या शाळेला सुट्टी होती. सुट्टीचा दिवस असल्यामुळे कुंदा आणि तिच्या मैत्रिणी नदीच्या काठावर खेळायला गेल्या होत्या. कुंदा वयाच्या आठव्या वर्षीच पोहायला शिकली होती. पाहता पाहता ती पट्टीची जलतरणपटू बनली होती. नदीकाठच्या कडूनिंबाच्या मोठ्या झाडाखाली सगळ्या मैत्रिणी हासत-बागडत खेळत होत्या. दूरवर शेतात शेतकरी व काही बायका कामात मग्न होत्या.



खेळता खेळता लहानगी रझिया व नीला नदीकडे केव्हा गेल्या, ते कळलेच नाही. इकडे कुंदा व तिच्या मैत्रिणी खेळण्यात दंग होत्या. एवढ्यात नीलाचा मोठमोठ्याने रडण्याचा व ओरडण्याचा आवाज आला. 'धावा! धावा! लवकर या, रझिया पाण्यात पडली.' 'कुणीतरी वाचवा हो!' ही हाक कुंदाच्या कानावर पडल्याबरोबर ती धावतच नदीकिनारी पोहोचली. आजूबाजूचे लोक आवाज ऐकून नदीकडे धावू लागले. मुलींचा गलका वाढला होता. कुंदा धावत येऊन काठावर क्षणभर उभी राहिली. रझिया पाण्यात गटांगळ्या खात पाण्याच्या प्रवाहाबरोबर पुढे पुढे वाहत चालली होती.



कुंदाने क्षणात नदीच्या पात्रात उडी घेतली व सरसर पोहत रझियाच्या दिशेने निघाली. तोवर आजूबाजूचे लोक जमा झाले. 'अरेऽ अरेऽ रझिया बुडते आहे. एवढीशी कुंदा तिला कशी वाचवणार?' लोक जोरजोरात ओरडत होते, 'कुंदा, पाण्याचा वेग वाढतो आहे. माघारी फीर.' जमलेली माणसे ओरडत होती. कुंदाला फक्त रझिया दिसत होती. कसेही करून तिला वाचवायचे एवढाच विचार तिच्या मनात होता. कोणाचेही शब्द तिच्या कानावर पडत नव्हते. भरभर पोहत कुंदा रझियाजवळ पोहोचली. रझिया घाबरली होती. तिच्या नाकातोंडात पाणी गेले होते. 'रझिया घाबरू नको, मी आले आहे. आता फक्त माझ्या दंडाला घट्ट धर.'

कुंदाने रझियाला काठाकडे आणले. तोवर लोकांनी मोठा दोर पाण्यात सोडला होता. कुंदाने त्याला धरले. सर्वांनी या दोघींना बाहेर काढले. ही बातमी गावभर पसरली.

ही बातमी रझियाच्या घरीही पोहोचली. तिची आई धावत आली. त्या दोघी सुखरूप पाहून तिने दोघींना घट्ट कवटाळले. तिच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. ‘कुंदा, आज तुझ्यामुळेच माझ्या रझियाचा जीव वाचला. केवढी धाडसी मुलगी आहेस तू!’

रझियाने कुंदाला मिठी मारली. तोवर कुंदाचे आई-बाबा आले होते. कौतुकाने व अभिमानाने त्यांनी मुलीला जवळ घेतले. आज साऱ्या गावात कुंदाच्या साहसाचीच चर्चा होती. साऱ्यांच्या कौतुकाच्या वर्षावाने कुंदा आनंदून गेली.

---

**शब्दार्थ :** **पट्टीची जलतरणपटू** – पोहण्यात एकदम तरबेज असलेली. **मग्न, दंग असणे** – गुंग असणे. **गलका वाढणे** – आवाज वाढणे. **गटांगळ्या खाणे** – पाण्यात वर-खाली होण्याची क्रिया. **माघारी** – मागे. **सुखरूप** – सुरक्षित. **कवटाळणे** – मिठी मारणे.

## स्वाध्याय



**प्र. १. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) झाडे, शेते हिरवीगार कशामुळे झाली होती?
(आ) कुंदा केव्हा पोहायला शिकली होती?
(इ) कुंदाला नदीवर कोणते दृश्य दिसले?
(ई) नदीच्या काठावरचे लोक कुंदाला कोणत्या सूचना देत होते?
(उ) रझियाच्या आईच्या डोळ्यांतून आनंदाश्रू का आले?

**प्र. २. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

| | |
|---|---|
| (अ) प्रसन्न × | (ई) हसणे × |
| (आ) दूरवर × | (उ) पुढे × |
| (इ) शूर × | (ऊ) लवकर × |

**प्र. ३. पोहण्यामध्ये तरबेज असलेल्या व्यक्तीला ‘जलतरणपटू’ म्हणतात. या प्रकारचे खालील शब्द वाचा व त्यांच्या योग्य जोड्या लावा.**

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| (अ) क्रिकेट खेळण्यात पटाईत | (१) वक्ता |
| (आ) धावण्यात पटाईत | (२) क्रिकेटपटू |
| (इ) भाषण करण्यात पटाईत | (३) धावपटू |

**प्र. ४. खालील खेळ खेळण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू/गोष्टी लिहा.**

| | |
|---|---|
| (अ) क्रिकेट – | (उ) संगीतखुर्ची – |
| (आ) कबड्डी – | (ऊ) विटीदांडू – |
| (इ) फुटबॉल – | (ए) लगोरी – |
| (ई) लिंबूचमचा – | (ऐ) पोहणे – |

**प्र. ५. कंसातील वाक्प्रचार दिलेल्या वाक्यांत योग्य ठिकाणी वापरा.**
**(दंग होणे, गलका वाढणे.)**


(अ) शाळेची सुट्टी झाल्याबरोबर शाळेच्या मैदानात विद्यार्थ्यांचा ………… वाढला.

(आ) परीक्षा असल्यामुळे मुले अभ्यासात ………… झाली.

**प्र. ६ आंतरजालाचा उपयोग करून भारतीय जलतरणपटू यांची माहिती घ्या. प्रत्येक खेळाडूची माहिती चार–पाच वाक्यांत लिहा.**

**प्र. ७. तुम्ही रझियाचे ‘हितचिंतक’ आहात, या नात्याने तिला कोणत्या सूचना द्याल?**

**प्र. ८. पाठ वाचून तुम्हांला कुंदाचे कोणकोणते गुण जाणवले ते लिहा.**




**प्र. ९. कुंदाचे अभिनंदन करणारा कोणता संदेश तुम्ही भ्रमणध्वनीवरून पाठवाल ते खालील चौकोनात लिहा.**

------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

## वाचू आणि हसू.

**आई :** किती वेळा तुला सांगायचं, त्या डब्याजवळ जाऊ नकोस म्हणून!

**आशू :** आता नाही सांगावं लागणार. आता त्या डब्यातले लाडू संपले आहेत.

एक वेडा गाढवावर बसून जात असतो. दुसरा वेडा त्याला थांबवतो अन् विचारतो, ‘‘अरे, हेल्मेट का नाही घातलंस?’’

तेव्हा पहिला वेडा म्हणतो, ‘‘अरे, नीट बघ ना खाली. फोर व्हिलर आहे फोर व्हिलर!’’

## आपण समजून घेऊया.


- **खालील शब्दसमूह वाचा.**

सुंदर फुले, गोड आंबा, उंच डोंगर, ताजे दूध, पिवळा झेंडू, सात केळी, लांब नदी, अवखळ मुले.

वरील शब्दसमूहात फुले, आंबा, डोंगर, दूध, झेंडू, केळी, नदी, मुले ही नामे आहेत, तर सुंदर, गोड, उंच, ताजे, पिवळा, सात, लांब, अवखळ हे शब्द त्या नामांबद्दल विशेष माहिती सांगणारे शब्द आहेत. **अशा शब्दांना विशेषण म्हणतात.**

**शिक्षकांसाठी :** पाठातील कोणत्याही एका परिच्छेदाचे अनुलेखन व श्रुतलेखन करून घ्यावे.

- **खालील आकृतीत गुलाबाच्या फुलाला आठ विशेषणे लावली आहेत. ती समजून घ्या.**




- **खालील चित्रांना दोन-दोन विशेषणे लावा.**



________

________



________

________



________

________



________

________

- **खालील वाक्ये वाचा.**

(अ) अरेरे! तू पडलास.

(आ) शाबास! छान खेळलास.

(इ) अरे वाह! छान कपडे आहेत.

उत्कट भावना व्यक्त करताना ती दाखवणाऱ्या शब्दांच्या शेवटी '!' असे चिन्ह देतात. **या चिन्हास उद्‌गारचिन्ह म्हणतात.**

# ९. घर

● ऐका. म्हणा. वाचा.



घर नाही चार भिंती
घर असते देखण्या कृती,
घर नाही एक वस्तू
घर म्हणजे आनंदी वास्तू.
  घर नाही नुसत्या खोल्या
  घरात हव्या भावना ओल्या,
  घरात हवा जिव्हाळा
  घर शिक्षणाची पहिली शाळा.
घर नाही नुसता पसारा
घर नाही केवळ निवारा,
घराला असते कहाणी
घराला असतो आपला चेहरा.
  घर शिकवते पाहायला
  चालायला, धावायला,
  घर शिकवते लढायला
  दु:खाचा डोंगर चढायला.
घराने असावे सावधान
घराने द्यावे समाधान,
घराने ठेवावे काळाचे भान
जवळ करावीत नवी मूल्ये, नवीन ज्ञान.
  घरात आईचे अपार कष्ट
  आजी सांगते सुंदर गोष्ट,
  घरात आजोबा गप्पिष्ट
  आईच्या हातचे जेवण चविष्ट.





**– धुंडिराज जोशी**

---

शब्दार्थ : **देखण्या** – सुंदर. **वास्तू** – इमारत. **ओल्या भावना** – प्रेमळ भावना. **जिव्हाळा** – प्रेम. **दु:खाचा डोंगर चढणे** – दु:खाला सामोरे जाणे. **जवळ करणे** – स्वीकारणे. **अपार** – अमाप. **गप्पिष्ट** – गप्पा करणारे. **चविष्ट** – चव असलेले.

## स्वाध्याय



**प्र. १. एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) माणसाची पहिली शाळा कुठे सुरू होते?

(आ) घराने कोणत्या गोष्टी जवळ कराव्यात?

(इ) आईच्या हातचे जेवण कसे असते?

**प्र. २. कवीने घराचे वर्णन कोणत्या शब्दांत केले आहे ते लिहा.**

**प्र. ३. खालील आकृती पूर्ण करा.**

घर व्यक्तीला काय काय शिकवते ?

**प्र. ४. शब्दातील शेवटचे अक्षर सारखे येणारे शब्द कवितेतून शोधा व लिहा.**

(१) वस्तू (२) खोल्या (३) जिव्हाळा (४) पसारा (५) पाहायला

(६) सावधान (७) भान (८) गोष्ट (९) चविष्ट

**प्र. ५. योग्य पर्याय निवडा.**

(अ) घरात हव्या भावना ओल्या-म्हणजे

(अ) घरातील व्यक्तींनी रडावे.

(आ) घरातील व्यक्तींनी परस्परांवर प्रेम करावे.

(इ) घरातील व्यक्तीत एक व्यक्ती भावना नावाची असावी.

(ब) घर शिक्षणाची पहिली शाळा-म्हणजे

(अ) घरामध्ये बालमंदिर भरते.

(आ) घरापासून शिक्षणाला सुरुवात होते.

(इ) घराच्या शाळेत नाव घातले जाते.

(क) जवळ करावीत नवी मूल्ये नवीन ज्ञान-म्हणजे

(अ) नवी मूल्ये व नवीन ज्ञानाच्या जवळ राहायला जावे.

(आ) रोज नवीन मूल्यांची व ज्ञानाची पुस्तके वाचावीत.

(इ) काळानुसार मूल्य व ज्ञानातील बदल स्वीकारावे.

**प्र. ६. तुमच्या परिसरातील घराला दिलेली नावे पाहा. यादी करा.**

**प्र. ७. खालील शब्द व त्यांचे अर्थ लक्षात ठेवा.**

(१) चविष्ट - चव असणारे.

(२) विशिष्ट - ठरावीक प्रकारचा.

(३) भ्रमिष्ट - भ्रम झालेला.

(४) गप्पिष्ट - गप्पा मारणारा.


(५) कोपिष्ट - रागावलेला.


(६) अनिष्ट - योग्य नसलेले.

**प्र. ८. खालील शब्दांचे लिंग ओळखा व वचन बदला.**

| शब्द | लिंग | वचन |
|---|---|---|
| उदा., घर | नपुंसकलिंगी | घरे |
| भिंत | स्त्रीलिंगी | भिंती |
| चेहरा | पुल्लिंगी | चेहरे |
| निवारा | | |
| आई | | |
| डोंगर | | |
| हवा | | |
| आजोबा | | |

**प्र. ९. खालील शब्द शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.**




**प्र. १०. खालील शब्द वाचा. लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| सूर्य | चक्र | राष्ट्र | वाऱ्यावर |
| कार्य | खग्रास | महाराष्ट्र | साऱ्यांचा |
| पूर्व | प्रकाश | सौराष्ट्र | कोऱ्या |
| सर्व | तक्रार | राष्ट्रध्वज | ताऱ्यांना |
| कर्क | आम्र | राष्ट्रीय | चाऱ्याला |

**प्र. ११. वस्तू आणि वास्तू या दोन शब्दांतील लेखनामध्ये फक्त 'काना' दिल्याने फरक पडतो; परंतु अर्थामध्ये खूप फरक आहे. खाली दिलेल्या शब्दांचे अर्थ शोधा. लिहा.**

उदा., (१) वस्तू - जिन्नस, नग (२) वास्तू - घर


(१) कप-काप (२) तार-तारा (३) खरे-खारे (४) गर-गार

(५) घर-घार (६) चार-चारा (७) पर-पार (८) वर-वार

**प्र. १२. तुमच्या घराचे चित्र काढून रंगवा व त्याचे सहा-सात वाक्यांत वर्णन करा.**

- चित्राच्या जागी योग्य शब्दाचा वापर करून खालील म्हणी पूर्ण करा.

(१) पाण्यात राहून  वैर करू नये.


(२) वासरात लंगडी  शहाणी.

(४) अडला हरी  पाय धरी

- खालील चित्रांचा सहसंबंध लावून गोष्ट तयार करा.









# १०. बाबांचं पत्र



प्रिय वैष्णवी,

अनेक शुभ आशीर्वाद.

मी कामात पुरता गुरफटलो होतो, म्हणून पत्र पाठवायला उशीर होत आहे. तुझ्या आईने मला दूरध्वनीवरून सांगितले, की तुला सहामाहीचा गणिताचा पेपर खूपच कठीण गेला, म्हणून तू फार निराश झाली आहेस. पेपरहून घरी आल्यानंतर त्या दिवशी तू रडतही होतीस. मला वाटलं दूरध्वनीवरून तुझ्याशी बोलण्यापेक्षा तुला पत्र लिहूनच तुझ्याशी हितगुज करावं, म्हणून तुझ्यासाठी हे पत्र लिहीत आहे.

अगं वैष्णवी, गणिताचा पेपर कठीण गेला, म्हणून गणितानंतर असलेल्या विषयांचे पेपर अवघडच जाणार असे होत नाही ना! मग त्याच त्या गोष्टीचा विचार करत बसल्याने उरलेल्या पेपरवरही त्याचा विपरीत परिणाम होतो. अगं, एखाद्या विषयात गुण कमी पडले, तर याचा अर्थ आपण आयुष्यात अपयशी झालो असे नाही. तुला सांगतो, गणिताशी तू मैत्री कर. मग बघ गंमत या विषयाची. तुला मुळीच भीती वाटणार नाही. गणितातील संकल्पना, संबोध, क्रिया तू नीट समजावून घे. उदाहरणे सोडवण्याचा चांगला सराव कर. हा विषय लवकरच तुझा लाडका होईल, हे अगदी नक्की.

बाळा, आणखीन एक तुला सांगतो. परीक्षेतील गुण किंवा श्रेणी महत्त्वाची आहेच; पण त्याहीपेक्षा आपल्या आंतरिक गुणांची वाढ करणे हे अधिक महत्त्वाचे आहे. तू गोष्टी छान सांगतेस, चित्रं उत्तम काढतेस अन् सुंदर नृत्यही करतेस. हे सारं सुरू ठेव. तुझ्या आईने सांगितले, की हल्ली तू यांकडे फारसं लक्ष देत नाहीस. या कला आपले जीवन सुंदर करतात आणि आपलं व्यक्तिमत्त्वही फुलवतात, त्यामुळे प्रत्येकाने एखादी तरी कला जोपासली पाहिजे. स्वतःमधील गुणांची वाढ करायला तुला अनेक संधी मिळतील. त्यांचा तू पुरेपूर उपयोग करून घे. बाबांनी सांगितलेले ऐकून त्याप्रमाणे तू वागशील याची मला खात्री आहे.

दिवाळीच्या सुट्टीत मी गावी येणार आहे. मग आपण खूप खूप मजा करू, किल्ले बांधू, कंदील तयार करू, गप्पा मारू आणि दिवाळीचा फराळही खाऊ. खाऊवरून एक गोष्ट आठवली मला. या दिवाळीत गावी येताना तुझ्या आवडीचा खाऊ घेऊन येणार आहे. कुठला ते तू ओळखलं असशीलच. तुझा पुस्तकांचा खाऊ! गावी येताना मी तुझ्यासाठी गोष्टींची अनेक पुस्तके घेऊन येणार आहे. वाचून बघ तू. खूप आवडतील तुला. बरं, आता थांबतो. बाकी सारे भेटीअंती बोलू.



तुझे बाबा..

**– एकनाथ आव्हाड**

**शब्दार्थ :** **गुरफटणे** – गुंतून राहणे. **निराश** – नाराज. **हितगुज करणे** – आपल्या मनातील गोष्टी सांगणे. **विपरीत** – वाईट. **संबोध** – मूळ संकल्पना. **आंतरिक गुण** – अंगभूत गुण. **भेटीअंती** – भेट झाल्यानंतर.

## स्वाध्याय



**प्र. १. एका शब्दात उत्तरे लिहा.**

(अ) कठीण गेलेला पेपर –

(आ) वैष्णवीला पत्र लिहिणारे –

(इ) परीक्षेतील गुणांपेक्षा महत्त्वाचे गुण –

(ई) वैष्णवीसाठी बाबा आणणार असलेला खाऊ –


**प्र. २. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) आईने दूरध्वनीवरून बाबांना कोणता निरोप दिला ?


(आ) बाबांनी दूरध्वनीवरून बोलणे का पसंत केले नाही ?

(इ) गणित विषय वैष्णवीचा लाडका होण्यासाठी बाबांनी कोणते उपाय सुचवले आहेत ?


**प्र. ३. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **प्र. ४. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**




**प्र. ५.** (अ)




(आ)




**प्र. ६. सध्याच्या युगात पत्र पाठवण्याची कोणकोणती साधने उपलब्ध आहेत त्यांची यादी करा.**

**प्र. ७. दिवाळीच्या सुट्टीत तुम्ही काय काय गंमत करणार त्याची यादी बनवा.**

प्र. ८. तुमच्या मित्राला/मैत्रिणीला पोहण्याच्या स्पर्धेत राज्यातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला. त्याचे/तिचे अभिनंदन करणारा संदेश खालील चौकटीत लिहा..

प्र. ९. ‘अपयश ही यशाची पहिली पायरी आहे.’ यासारखी दोन वाक्ये खालील चौकटीत लिहा.

(१) ________

(२) ________

**प्रकल्प :** साने गुरुजी यांचे ‘सुंदर पत्रे’ हे पुस्तक मिळवा. वाचा. त्यातील तुम्हांला आवडलेली पत्रे सुरेख अक्षरांत लिहा.

- **खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य विशेषणे लिहा.**

(टवटवीत, उंच, नवा, शंभर)

(अ) हिमालय ................ पर्वत आहे.

(आ) कंपास घ्यायला आईने मला ................ रुपये दिले.

(इ) बागेत ................ फुले आहेत.

(ई) ताईने मला ................ सदरा दिला.

## आपण समजून घेऊया.

- **खालील तक्ता वाचा. समजून घ्या.**

| अ.क्र. | वाक्ये | काळ |
|---|---|---|
| (१) | अन्वर वेगाने धावतो. | वर्तमानकाळ |
| (२) | काल अन्वर वेगाने धावला. | भूतकाळ |
| (३) | उद्या अन्वर वेगाने धावेल. | भविष्यकाळ |

क्रियापदाच्या रूपावरून वाक्यांतील काळ ओळखता येतो.
काळाचे मुख्य तीन प्रकार आहेत.

१. वर्तमानकाळ

२. भूतकाळ

३. भविष्यकाळ

# ११. मिनूचा जलप्रवास

एक होती नदी. तिच्यात होते खूप खूप पाणी. निळे निळे, थंडगार व स्वच्छ! इतके स्वच्छ की वरून पाहिले, की तळाची वाळू दिसायची. गोल गोल गोटे दिसायचे अन् सुळसुळ पोहणारे छोटे मासेही दिसायचे. माशांच्या समूहात राहायची मिनू मासळी ! मिनू होती इवलीशी. अगदी तुमच्या हाताच्या छोट्या बोटाएवढी. रुपेरी कल्ल्यांची! इतर मासे तिचे खूप खूप लाड करायचे. तिला क्षणभरही नजरेआड होऊ द्यायचे नाहीत; पण मिनूला नदीच्या त्या खोलगट भागात राहायचा कंटाळा आला होता.

ती आईला विचारायची, ''आई, एवढं पाणी रोज कुठं जातं?'' आई म्हणायची, ''मिनू, पुढे मोठा समुद्र आहे त्यात जातं! ''आई, समुद्र केवढा असतो?'' मिनू विचारी. ''मला माहीत नाही बाळ.'' आई म्हणायची.

मिनू मधूनमधून विचार करायची, खरेच केवढा असेल बरे समुद्र? रोज एवढे पाणी त्यात जमते म्हणजे खूपच मोठा असणार आणि खूप खूप खोलही! असे केले तर! तो समुद्रच बघून आलो तर! आनंदाने तिने टुणकन उडीच मारली.

एक दिवस मुसळधार पाऊस पडू लागला. जमिनीवरून पाण्याचे लोंढे वाहायला लागले. नदीचे पाणी गढुळले. मासे बावरून एकमेकांना शोधू लागले; पण कोणीच कोणाला दिसेना. पाणी वेगाने वाहत होते. या गोंधळात मिनूची व आईची चुकामूक झाली व पाण्याबरोबर मिनूही गिरक्या घेत निघाली. खूप वेळ ती अशीच पोहत होती. मिनूने हळूच तोंड उघडले. थू थू! सगळे खारट पाणी! अय्या! म्हणजे समुद्र, समुद्र म्हणतात तो आला की! बापरे, केवढा लांबपर्यंत पसरलेला आहे. नजरसुद्धा पोहोचत नाही इतक्या लांब! चला, थोडीशी चक्कर मारून परत जावे झाले! मिनू हळूहळू पुढे निघाली. पाण्यात एका बाजूला लांबपर्यंत खडकांच्या रांगा होत्या. त्यांतील एका खडकावर फुलेच फुले होती. नदीच्या पाण्यावर तरंगायची तशी! मिनूला गंमत वाटली. ती हळूहळू पुढे निघाली. लाल, गुलाबी, अंजिरी फुले. किती छान छान रंग होते त्यांचे!

इतक्यात तिची एका विचित्र माशाशी टक्कर झाली. त्याचे तोंड घोड्यासारखे होते व पोटाला पिशवी होती. त्यात छोटी छोटी पिल्ले बसलेली होती. मिनूला क्षणभर हसूच आले.



''कोण तुम्ही?'' तिने विचारले; पण तो पिवळा मासा काहीच न बोलता हळूहळू पुढे गेला.

एवढ्यात तळाकडून आवाज आला. ''त्याचं नाव घोडमासा, समुद्रघोडा!'' आवाजाच्या रोखाने मिनूने पाहिले. तळाशी एक मोठे कासव बसले होते. नदीत असते त्यापेक्षा कितीतरी मोठे! मिनू लाटांच्या पायऱ्या उतरत त्याच्याजवळ पोहोचली व म्हणाली,

''कासवदादा, तुम्ही इकडं कधी आलात?''



''मी तर इथंच राहतो'' ते म्हणाले.

''नाहीच मुळी. आमच्या नदीतही एक छान छान कासवदादा आहेत.''

'' ते वेगळे. मी समुद्रात राहतो! पण तू इकडं का आलीस? इथं तर पावला - पावलांवर संकटं उभी आहेत. बघितलंस किती चित्रविचित्र मासे फिरतायत इकडून तिकडे! तो आठ हात असलेला अष्टभुज मासा. तो कसा उलटा चालतोय, बघितलंस का? पाण्याच्या चुळा भरत हळूहळू मागं सरकतो. आपल्या आठ हातांनी मासे, खेकडे पकडून खातो. पाण्यात उतरणारी माणसंसुद्धा त्याला घाबरतात बरं का!''

''पण कासवदादा, इथं तर तळाला नदीसारखेच शंख-शिंपले पडलेले आहेत!''

''पण नदीतल्या शंख-शिंपल्यांत काय असते? इथं या दोन शिंपल्यांच्या पेटीत एक किडा बसलेला असतो बरं का! त्याला चालायचं असलं, की आपले पाय फटीतून बाहेर काढून तो हळूहळू चालतो. हा अगदी मांसाचा गोळा असतो गोळा. या शिंपल्यात चुकून एखादा वाळूचा कण गेला, की तो याच्या अंगाला टोचायला लागतो. मग तो आपल्या अंगातून पातळ रस काढून त्यावर गुंडाळतो. तरी बोचणं काही संपतच नाही. हा आपला तसाच गुंडाळत राहतो. मग त्यातून छानदार मोती तयार होतो. इथं तळापर्यंत कधी कधी माणसं येतात. शिंपले उचलून घेऊन जातात.''

इतक्यात त्यांच्यामधून एक प्राणी तिरका तिरका चालत गेला. तो आपल्या बटबटीत डोळ्यांनी मिनूकडे पाहत होता. आता मात्र मिनूची घाबरगुंडी उडाली. पळत जाऊन ती कासवदादाजवळ उभी राहिली.

''घाबरू नकोस, हा तर खेकडा! याच्या पाठीवर माझ्यासारखंच कठीण कवच आहे. त्यामुळे शत्रू याच्यावर हल्ला करू शकत नाही. याला सहा तर कधी आठ पायही असतात. तरीपण बेट्याला सरळ मात्र

चालता येत नाही. तोंडाजवळ दोन नांग्या असतात त्यामुळे त्याचं संरक्षणही होतं व त्याला भक्ष्यही पकडता येतं.

''आता तू माझ्याबरोबर चल, आपण खूप दूर व खूप खूप खोल जाऊ. तिथे खूप अंधार असेल, कारण इतक्या खोलवर प्रकाश पोहोचत नाही. तिथं प्रचंड आकाराचे मासे पोहतात. काही माशांच्या अंगातून उजेड बाहेर पडतो. चल येतेस गंमत बघायला?''

''नको रे बाबा.'' घाबरून मिनू म्हणाली, ''मला माझ्या आईकडे जायचंय.''

कासवदादा हसून तिच्याबरोबर निघाले. वाटेत ठिकठिकाणी जाळी सोडलेली होती. ती चुकवत त्यांनी मिनूला नदीत आणून सोडले!

अहाहा! नदीच्या गोड पाण्याचा स्पर्श मिनूच्या अंगाला झाला. तिने दोन-तीन चुळा भरल्या. खारट तोंड स्वच्छ धुतले गेले.

''कासवदादा, चला ना माझ्याबरोबर.'' तिने आग्रह केला.

''नको मिनू. जसा तुला समुद्र आवडत नाही, तशीच मला नदी आवडत नाही. बरं! येतो मी, तू मात्र आता घरीच जा हं!'' वळून बघत कासवदादा हळूहळू निघाले.

मिनूला क्षणभर वाईट वाटले. कासवदादांनी तिला कितीतरी गमती दाखवल्या होत्या. त्या कधी एकदा आईला सांगेन, असे तिला झाले होते.

**– विनया साठे**

---

**शब्दार्थ : जलप्रवास** – पाण्यातील प्रवास. **मासोळी** – लहान मासा. **मुसळधार** – फार जोराचा. **लोंढे**– खूप लोट. **चक्कर मारून** – भटकून, फिरून. **डोळे विस्फारणे** – डोळे मोठे करणे. **भक्ष्य** – शिकार.

## स्वाध्याय



**प्र. १. एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) मिनू मासोळी कुठे राहायची?

(आ) मिनूला समुद्र का बघायचा होता?

(इ) नदीचे पाणी गढूळ का झाले?

(ई) खडकावर फुललेल्या फुलांचे रंग कोणते होते?

(उ) समुद्राच्या खोलवर अंधार का असतो?

**प्र. २. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) लेखिकेने नदीचे वर्णन कसे केले आहे?

(आ) मिनूची व आईची चुकामूक का झाली?

(इ) घोडमासा पाहून मिनूला हसू का आले?

**प्र. ३. कोण, कोणास व केव्हा म्हणाले ते लिहा.**

(अ) ''समुद्र, समुद्र म्हणतात तो आला की!''

(आ) ''त्याचं नाव घोडमासा, समुद्रघोडा!''

(इ) ''घाबरू नकोस, हा तर खेकडा!''

(ई) ''कासवदादा, चला ना माझ्याबरोबर.''

प्र. ४. शिंपल्यामध्ये मोती कसा तयार होतो? क्रमाने क्रिया लिहा.

प्र. ५. चार-पाच ओळींत वर्णन करा.

(अ) घोडमासा (आ) खेकडा

प्र. ६. 'इवलीशी' यासारखे आणखी शब्द लिहा.

प्र. ७. (अ) समानार्थी शब्दांच्या योग्य जोड्या लावा.

इवली

गरम

लांब प्रचंड

लहान उष्ण

दूर

मोठे

(आ) विरुद्धार्थी शब्दांच्या योग्य जोड्या लावा.

टणक

लहान

पुढे प्रकाश

मोठे मऊ

अंधार

मागे

प्र. ८. योग्य जोड्या लावा.

| नाम | विशेषण |
|---|---|
| (अ) मिनू | (१) मुसळधार |
| (आ) पाणी | (२) इवलीशी |
| (इ) डोळे | (३) खारट |
| (ई) पाऊस | (४) बटबटीत |

प्र. ९. खालील शब्द वाचा. समजून घ्या.

गदागदा, खालोखाल, पदोपदी, चित्रविचित्र, पटापट, रातोरात, मोठमोठी, पावलोपावली, मागोमाग

प्र. १०. तुम्ही मिनू मासोळी आहात अशी कल्पना करून समुद्राची माहिती आईला सांगा.

प्र. ११. शंख-शिंपल्यांपासून शोभेच्या वस्तू बनवा.

- खालील वाक्ये वाचा.

(अ) विसूने 'ताजमहाल', पाहिला.

(आ) मंदाने सुरेशला सांगितले, 'पायल तुझ्याकडे उद्या येणार आहे.'

एखाद्या शब्दावर जोर द्यावयाचा असता, दुसऱ्याचे मत अप्रत्यक्ष सांगताना (' - ') असे एकेरी अवतरणचिन्ह वापरले जाते.

- खालील वाक्यांतील काळ ओळखा.

(अ) सूर्य पूर्वेला उगवतो.

(आ) मला लाडू आवडला.

(इ) आईचा स्वयंपाक झाला होता.

(ई) मी गावाला जाईन.

(उ) तू का रडतेस?

(ऊ) मी पोहायला शिकणार आहे.

# १२. चंद्रावरची शाळा

● **ऐका. म्हणा. वाचा.**



एकविसाव्या शतकात भरेल
चंद्रावरती शाळा,
चंद्रावरच्या शाळेत नसेल
खडू आणि फळा.

छोट्या छोट्या यानांतून
शाळेत जातील मुले,
बटण दाबताच शाळेचे
दार होईल खुले.

दप्तराचे ओझे तेव्हा
नसेल पाठीवरती,
ऑक्सिजनचा सिलिंडरच
न्यावा लागेल वरती.

भाजी-पोळीच्या डब्याची
राहणार नाही कटकट,
जेवणाची गोड गोळी
घेऊन टाकायची पटपट.

पी. टी. चा तास
कसा होतो ते पहाल,
एक उडी मारताच
तसेच तरंगत रहाल.



दाबायची बटणे
एवढाच फक्त अभ्यास,
चंद्रावरती पोहोचलात की
झालातच पास.

अशी असेल भारी
चंद्रावरची शाळा,
चंद्रावरच्या शाळेत फक्त
चांदण्यांशीच खेळा.

**-चारुता पेंढरकर**

**शब्दार्थ :** **शतक** – शंभर. **यान** – अवकाशातून प्रवास करणारे सुसज्ज वाहन.

## स्वाध्याय



**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) चंद्रावरती शाळा कोणत्या शतकात भरेल?

(आ) चंद्रावरच्या शाळेत जाताना कशाचे ओझे नसेल?

(इ) चंद्रावरच्या शाळेत कशाची कटकट राहणार नाही?

(ई) चंद्रावरच्या शाळेत अभ्यास कसा करावा लागेल?

**प्र. २. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) चंद्रावरच्या शाळेत पास केव्हा केले जाते?

(आ) चंद्रावरच्या शाळेत चांदण्यांशीच का खेळावे लागणार आहे?

**प्र. ३. योग्य कारण शोधा.**

(अ) चंद्रावरच्या शाळेत जाताना ऑक्सिजनचा सिलिंडर न्यावा लागेल कारण...

(१) दप्तराऐवजी सिलिंडर न्यावा हा नियम असल्यामुळे.

(२) चंद्रावरती प्राणवायूचे प्रमाण कमी असल्यामुळे.

(३) सिलिंडर नेला तरच शाळेत येऊ देतात म्हणून.

(आ) चंद्रावर एक उडी मारताच तरंगत राहतात कारण...

(१) शिक्षक अशीच पी.टी. शिकवतात.

(२) विद्यार्थ्यांचे वजन कमी असते म्हणून तरंगतात.

(३) चंद्रावर गेल्यावर गुरुत्वाकर्षण कमी होते म्हणून तरंगतात.

**प्र. ४. शब्दातील शेवटचे अक्षर सारखे येणारे शब्द कवितेतून शोधा व लिहा.**

उदा., भरेल–नसेल.

**प्र. ५. 'पटपट' यासारखे शब्द लिहा.**

**प्र. ६. कवितेत आलेले इंग्रजी शब्द शोधून यादी करा.**

**प्र. ७. तुम्ही डब्यात रोज कोणकोणते पदार्थ नेता? नावे लिहा.**

**प्र. ८. कोणते पदार्थ डब्यात आणायचे नाहीत असे शिक्षक तुम्हांला वारंवार सांगतात? का ते लिहा.**

**प्र. ९. चंद्रावरच्या शाळेत तुम्ही शिकत आहात. तुम्हांला 'पृथ्वीचे' वर्णन करायला सांगितले आहे. कल्पना करा व लिहा.**

**उपक्रम :** चंद्रावरच्या शाळेचे चित्र तुमच्या कल्पनेने काढून रंगवा.

**प्रकल्प :** चंद्रावरच्या पाच कविता मिळवा व संग्रह करा.

- **खालील वाक्ये वाचा.**

(अ) गणेश आईला म्हणाला, ''मी कधीही चुकीचे वागणार नाही.''

(आ) ताई दादाला म्हणाली, ''मला उद्या शाळेला सोडशील का?''

बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द दाखवण्याकरता '' – '' असे दुहेरी अवतरणचिन्ह वापरले जाते.

# १३. मोठी आई

आपली आई आपल्यावर किती माया करते. खाऊपिऊ घालते. पोटाशी घेते. गोष्टी सांगते. किती छान असते आपली आई!

या आईहून एक मोठी आई आहे. तीदेखील किती छान आहे! तिने तुम्हां-आम्हांला लागणारी प्रत्येक गोष्ट तयार केली आहे. कोणत्या ना कोणत्या स्वरूपात दिली आहे. हे जेवणाचे ताट पाहा. यातला प्रत्येक जिन्नस मोठी आई होती म्हणून मिळाला आहे. तुम्ही राहता ते घर, त्याला लागणारे लाकूड, दगडसुद्धा त्या आईने दिले. कोण बरे अशी ही मोठी आई? तिचे नाव भूमी! जमीन!

जमिनीत काय आहे? माती. हीच का ती आई? तुम्ही म्हणाल-खरेच ते. मातीच आहे जमिनीत; पण मातीला तुम्ही कमी समजू नका. माती आहे म्हणूनच आपण जिवंत आहोत.



जेवणाच्या ताटातला प्रत्येक जिन्नस मोठ्या आईने दिला, म्हणजेच तो जमिनीतून निर्माण झाला. गव्हाची पोळी, जोंधळ्याची भाकरी, तांदळाचा भात! गहू, तांदूळ व जोंधळे कोठे तयार होतात? शेतातच ना! पाटी-पेन्सिलीचे मऊ दगडही जमिनीतच सापडतात.

चहाची साखर घ्या. ती उसापासून करतात; पण ऊस उगवतो कोठे? जमिनीत. रॉकेल कुठे सापडते? जमिनीतल्या खाणीत. केळी, कवठे, पेरू, आंबे, नारळ, द्राक्षे, फणस इत्यादी तुम्हांला आवडणारी फळे जमिनीमुळे मिळतात. जमीन नसती तर यांतला एकही जिन्नस मिळाला नसता. साऱ्या भाज्या, जगातील सारी फुले, औषधांची सगळी झाडे जमिनीतूनच जीव धरून वाढतात. आहे ना आपली आई मोठी?



तुम्ही वापरता ते कपडे पाहा. हे सुताचे आणि रेशमाचे आहेत. सूत कशाचे असते? कापसाचे. कापूस कोठून मिळतो? कपाशीच्या झाडापासून. रेशीम कोठून मिळते? रेशमाचे किडे असतात. तुतीच्या झाडावर ते जगतात. ही कापसाची व तुतीची झाडे जमिनीतच वाढतात. जमीनच प्रत्येक जिन्नस निर्माण करते हे तुम्हांला यावरून कळून येईल.



चांदी, रुपे, पितळ, तांबे या सगळ्यांच्या खाणी मोठ्या आईच्या पोटात सापडतात. पितळ, तांबे, कथील नसते, तर आपण भांडी कशाची केली असती? सोने, रुपे नसते तर दागिने कसे मिळाले असते?

एवढेच नाही! अजून ऐका. या मोठ्या आईच्या पोटात लोखंड व दगडी कोळसा यांच्याही प्रचंड खाणी आहेत. लोखंड व कोळसा यांमुळे तर प्रत्येक गिरणी अन् प्रत्येक कारखाना चालतो. कारखाने नसते, तर लोखंडी खुर्च्या व पलंग मिळाले नसते. सुया, टाचण्या, चाकू, कात्र्या, गुंड्या, काचेचे सामान, मोटारी, आगगाड्या, विमाने इत्यादी सगळे सगळे बनलेच





नसते, लोखंड आणि कोळसा नसता तर! सांगा, या दोन गोष्टी देणारी आई मोठी नव्हे काय?

आता घराबद्दल पाहाल तरी तेच उत्तर द्यावे लागेल. तुमचे घर कशाचे बांधले आहे? दगड, माती, विटा, चुना अन् लाकूड यांचे. घराला लाकडाचे खांब, दारे, खिडक्या आहेत. दाराच्या कड्या, तुळया व बिजागऱ्या लोखंडी आहेत.



यातील दगडमाती जमिनीतूनच आणली गेली. विटा कशाच्या आहेत? लाल मातीच्या. लाल माती कोठून आणली? जमिनीतून. चुना कुठे मिळतो? जमिनीत चुनखडीचे खडक असतात. चुना या खडकांपासून तयार करतात. लाकूड कोठून आणले? मोठमोठ्या रानांतील वाळलेली प्रचंड झाडे तोडून हे आणले. दाराला लोखंडाच्या बिजागऱ्या, कड्या, कुलुपे, खिळे बसवले आहेत. हे लोखंडही भूमातेच्या पोटातच सापडते.

तुम्ही कोणतीही गोष्ट घ्या. जमिनीमुळे ती मिळालेली आहे. हे तुमच्या आता लक्षात आलेच असेल!

तुम्ही दूध-दही-तूप खाता! गाई-म्हशींपासून हे आपण मिळवतो; पण या गाई-म्हशी जगतात कशावर? गवत व कडबा यांवर. हे कोण त्यांना देते? आपली मोठी आई.

जगात जी जी सुंदर गोष्ट दिसते ती अशा प्रकारे मोठ्या आईपासून उत्पन्न झालेली आहे. जगलेली आहे व वाढलेली आहे!

ती तुम्हांला अन्न-वस्त्र देते, दागिने देते, घरदार देते, धनधान्य देते, भांडीकुंडी देते, चहासाखर, पाटीपेन्सिल देते, सगळे सगळे देते. त्या मोठ्या आईचे केवढे उपकार मानले पाहिजेत! अन् मग अशी जी जमीन किंवा धरणीमाता तिचे छोटेसे रूप म्हणजे आपली मातृभूमी! त्या भूमीतले अन्न खाऊनच आपण मोठे झालो, शहाणे झालो. माणसांना प्रत्येक गोष्ट दिली ती या भूमीनेच. त्या मायभूमीबद्दल आपण मनात नेहमी प्रेमभाव बाळगावयास नको का?

आपली मोठी आई म्हणजेच आपली मायभूमी!

**– मालतीबाई दांडेकर**

**शब्दार्थ:** **जिन्नस** – वस्तू. **तुळया** – लोखंडाच्या जाड सळया. **कडबा** – कणसे कापून घेऊन उरलेला गुरांना खाण्याचा भाग, वैरण. **मातृभूमी** – जन्मभूमी. **प्रेमभाव बाळगणे** – प्रेम असणे.

## स्वाध्याय



**प्र. १. एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) घर बांधण्यासाठी कोणकोणत्या वस्तू लागतात?

(आ) जमिनीच्या पोटात कोणकोणती खनिजे सापडतात?

(इ) कारखान्यात धातूपासून कोणकोणत्या वस्तू तयार होतात?

(ई) चुना कशापासून तयार करतात?

(उ) लेखिकेच्या मते मातृभूमीबद्दल प्रेमभाव का बाळगावा?

**प्र. २. तुम्ही खात असलेल्या अन्नपदार्थांतील कोणकोणत्या वस्तू जमिनीकडून मिळतात, त्यांची यादी बनवा.**

**प्र. ३. आपण मातृभूमीबद्दल प्रेमभाव का बाळगायला हवा ते तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र. ४. 'मोठी आई' साठी पाठात वापरले गेलेले शब्द शोधा व लिहा.**

**प्र. ५. 'पाटीपेन्सिल' सारखे जोडशब्द पाठातून शोधून लिहा.**

**प्र. ६. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

(अ) मातृभूमी –
(आ) माया –
(इ) वस्त्र –
(ई) आई –

**प्र. ७. हे शब्द असेच लिहा.**

जिन्नस, भूमी, रॉकेल, निर्माण, प्रचंड, प्रत्येक, खुर्च्या, कात्र्या, गुंड्या, तुळया, गोष्ट, उत्पन्न, कृपेने, वस्त्र, मातृभूमी, कड्या, म्हशी, अन्न, पेन्सिल, प्रेमभाव, टाचण्या, साऱ्या, धनधान्य, द्राक्षे.

**प्र. ८. खालील पदार्थ कशापासून बनतात ते लिहा.**

उदा., साखर–ऊस.

(अ) फुटाणे –
(आ) मनुके –
(इ) भाकरी –
(ई) चपाती –
(उ) वेफर्स –
(ऊ) सॉस –
(ए) सरबत –
(ऐ) चिक्की –

**प्र. ९. खालील शब्दांचे अनेकवचन लिहा.**

(अ) तुळई –
(आ) बिजागरी –
(इ) झाड –
(इ) दागिना –
(ई) कवठ –
(उ) माती –

**प्र. १०. खालील तक्ता भरा.**

| अ. क्र. | मनुष्याचे खाद्य | घरबांधणीला उपयुक्त वस्तू | विविध खनिजे | प्राण्यांचे खाद्य |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |


**प्र. ११. शेतात पीक यावे म्हणून शेतकरी कोणकोणती कामे करतो? त्या कामांची यादी करा.**

**प्र. १२. खालील तक्ता पूर्ण करा.**


| लोखंडी वस्तू | काचेच्या वस्तू | लाकडी वस्तू | मातीच्या वस्तू |
|---|---|---|---|
| | | | |

**प्र. १३. जमिनीच्या खाली येणारी पिके व जमिनीच्या वर येणारी पिके यांची माहिती करून घ्या. त्यांची यादी तयार करा.**

**प्र. १४. खालील वस्तूंपासून तुमच्या घरी कोणकोणते पदार्थ तयार केले जातात. याविषयी आपापसांत गप्पा मारा.**




**प्र. १५. मोठ्या आईपासून प्राप्त होणाऱ्या गोष्टी लिहून आकृती पूर्ण करा.**




**उपक्रम :** आई, मातृभूमी या विषयावरील कवितांचा संग्रह करून त्या कवितांचे वर्गात वाचन करा.

**प्रकल्प :** शिक्षक किंवा पालकांच्या मदतीने जवळच्या शेताला भेट द्या. शेतात येणाऱ्या विविध पिकांचे निरीक्षण करून शेतातील अन्नधान्याबद्दल माहिती मिळवा.

- **खालील वाक्यांत ( ? ! '–' "–" . ,) घालून वाक्ये पुन्हा लिहा.**

(अ) आवडले का तुला पुस्तक आई म्हणाली.
(आ) तो प्रामाणिक आहे बाबांनी सांगितले.
(इ) गणू म्हणाला अग आई उद्या सुट्टी आहे असे दिनूने सांगितले म्हणून मी शाळेत गेलो नाही
(ई) अहाहा किती छान चित्र आहे
(उ) तुला लाडू आवडतो का
(ऊ) माझे काका मुंबईला राहतात
(ए) मधू राजा रझिया व मारिया गप्पा मारत बसले

**वाचा.**

दिनेशने सोसायटीत प्रवेश केला. सोसायटीच्या प्रवेशद्वाराजवळ लावलेल्या फळ्यावर सुविचार लिहिला होता. 'प्रत्येक मानवाची गरज पूर्ण करण्यास निसर्ग समर्थ आहे; पण कोणतीही हाव नाही.' दिनेश विचार करू लागला, 'या सुविचारातून निसर्गाचे किती वास्तव स्वरूप दाखवले आहे.'

निसर्गातील प्रत्येक घटकाला देणे माहीत आहे, घेणे नाही. झाडे, वेली, पाने, फुले, नद्या, पर्वत, डोंगर, पशु, पक्षी, माती, चंद्र, सूर्य, तारे... निसर्गातील असे अनेक घटक आपले जीवन सुखकर व्हावे म्हणून मदतीला असतात. आपल्याला निसर्गाला काही देता आले नाही तर देऊ नये; पण त्याच्याकडून काही ओरबडून घेऊ नये. निसर्ग आपला मित्र आहे. आपण त्याचे मित्र का बनू नये?

# १४. अप्पाजींचे चातुर्य

खूप जुनी गोष्ट. विजयनगरमध्ये तेव्हा कृष्णदेवराय राज्य करत होते. त्यांच्या प्रधानांचे नाव होते अप्पाजी. अप्पाजी फार चतुर होते.



उत्तरेकडे कलिंग राज्य होते. त्या राज्याच्या राजाला वाटले, एकदा आपणही अप्पाजींची चतुराई पाहावी म्हणून त्याने कृष्णदेवरायांना निरोप पाठवला. 'तुमच्या राज्यात फार चवदार कोबी पिकतात असे मी ऐकले आहे. त्यांचा आस्वाद घेण्याची माझी इच्छा आहे. माझ्यासाठी काही कोबी पाठवाल का?'

कलिंग राजाला कोबी पाठवण्याची कृष्णदेवरायांना इच्छा होती; पण ते पाठवणार कसे? त्या काळी आजच्यासारखी वाहतुकीची जलद साधने नव्हती. वाहतूक चालायची ती बैलगाड्यांमधून. बैलगाड्या कलिंग राज्यात पोचायला तीन महिने लागत. आपण चांगली, ताजी कोबी पाठवली, तरी ती कलिंग राज्यात जाईपर्यंत कुजून जातील असे राजाला वाटले.

आपली शंका त्यांनी अप्पाजींना सांगितली. अप्पाजी म्हणाले, "त्यात काय अवघड आहे? एका बैलगाडीत गाडीवानाला बसण्यापुरती जागा सोडून बाकीच्या जागेत माती भरा. त्या मातीत कोबीचे बी पेरा. रोज कोबीच्या रोपांना पाणी देत पुढे जायला गाडीवानाला सांगा. गाडी कलिंग राज्यात पोहोचेपर्यंत कोबी तयार होतील."

राजाने अप्पाजींच्या सांगण्याप्रमाणे एका गाडीत माती भरून त्यात कोबीच्या बिया पेरून ती कलिंग राज्याकडे रवाना केली. गाडीवान प्रवासात रोज कोबींच्या रोपांना पाणी देत होता.

तीन महिन्यांनी ती बैलगाडी कलिंग राज्यात पोहोचली. कलिंग राजाला ताजी कोबी मिळाली. त्याला आनंद वाटला. अप्पाजींचे कौतुकही वाटले.

अप्पाजींची आणखी एक परीक्षा घ्यावी, असे कलिंगच्या राजाला वाटले. त्याने एकसारख्या दिसणाऱ्या तीन मूर्ती मागवल्या व म्हणाले, 'या तीनही मूर्ती दिसायला सारख्या असल्या, तरी यांतली एक मूर्ती निकृष्ट आहे, दुसरी मध्यम दर्जाची आहे आणि तिसरी उत्कृष्ट आहे. या सारख्या दिसणाऱ्या तीन मूर्तींमधील उत्कृष्ट कोणती ते मला सांगा.'

त्यांच्यामधील फरक इतर कोणालाही ओळखता येईना. अप्पाजी म्हणाले, 'मी सांगतो फरक.' त्यांनी एक लवचिक तार घेतली. ती एका मूर्तीच्या कानात घातली. तेथून ती तार मूर्तीच्या तोंडातून बाहेर पडली.



अप्पाजी म्हणाले, 'ही निकृष्ट मूर्ती.'

नंतर अप्पाजींनी ती तार दुसऱ्या मूर्तीच्या कानात घातली. ती तार त्या मूर्तीच्या दुसऱ्या कानातून बाहेर पडली. अप्पाजी म्हणाले, 'ही मध्यम दर्जाची मूर्ती.'

तिसऱ्या मूर्तीवरही अप्पाजींनी हाच प्रयोग केला. त्या मूर्तीच्या कानात घातलेली तार तिच्या तोंडातून वा दुसऱ्या कानातून–कोठूनच बाहेर पडली नाही. अप्पाजी म्हणाले, 'ही उत्कृष्ट मूर्ती.'

अप्पाजींनी कलिंग राजाला त्याच्या प्रश्नाचे उत्तर दिले– 'आपण मागवलेल्या मूर्तींपैकी एका मूर्तीच्या कानात घातलेली तार तिच्या तोंडातून बाहेर पडली, ती निकृष्ट मूर्ती. एखादा माणूस ज्या अफवा ऐकतो, त्याचा खरेखोटेपणा पडताळून न पाहता, जर तो त्या दुसऱ्यांना सांगू लागला, तर त्याचे व समाजाचेही हित होत नाही.' या मूर्तीचा असा अर्थ होतो.

'दुसऱ्या मूर्तीच्या एका कानातून घातलेली तार त्या मूर्तीच्या दुसऱ्या कानातून बाहेर पडली, ही मध्यम प्रतीची मूर्ती. एखाद्या माणसाने अफवा ऐकली आणि ती दुसऱ्या कानाने सोडून दिली, तर त्यात समाजाचे हितही होत नाही आणि नुकसानही होत नाही. हा दुसऱ्या मूर्तीचा अर्थ.

'तिसऱ्या मूर्तीच्या कानात घातलेली तार तेथेच अडून राहिली, ही तिसरी उत्कृष्ट मूर्ती. अफवा ऐकल्यावर जो माणूस दुसऱ्या कानाने ती सोडून देत



नाही किंवा लगेच ती दुसऱ्याला सांगत नाही, तर तिच्या खरेखोटेपणाची खात्री करून घेतो आणि आपण काय ऐकले ते पुराव्याशिवाय सांगत नाही, तो माणूस उत्तम.' हा तिसऱ्या मूर्तीचा अर्थ होय.

कलिंगच्या राजाला अप्पाजींचे उत्तर मिळाले. अप्पाजींनी तीनही मूर्तींचा दर्जा ओळखल्याने राजा संतुष्ट झाला. त्याने अप्पाजींचे व कृष्णदेवरायांचे अभिनंदन केले.

**– विलास गिते**

---

**शब्दार्थ:** **चतुर** – हुशार. **कीर्ती** – प्रसिद्धी. **चवदार** – चविष्ट. **कलिंग** – एका राज्याचे नाव. **गाडीवान** – वाहक, गाडी हाकणारा. **निकृष्ट** – कमी प्रतीचे. **अफवा** – खोटी बातमी. **संतुष्ट** – समाधानी. **पुरावा** – दाखला.

## स्वाध्याय



**प्र. १. एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) अप्पाजींनी बैलगाडीत कशाचे पीक घ्यायला लावले?

(आ) उत्कृष्ट दर्जाची मूर्ती कोणती?

(इ) कलिंगचा राजा संतुष्ट का झाला?

**प्र. २. तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) अप्पाजींनी ताजी कोबी कलिंग देशाकडे कशी पाठवली?

(आ) कलिंगच्या राजाने अप्पाजींची दुसऱ्यांदा कशी परीक्षा घेतली?

(इ) मूर्तीच्या तोंडात घातलेली तार तोंडातून बाहेर येते याचा अप्पाजींनी कोणता अर्थ लावला?

(ई) अप्पाजींच्या मते उत्तम माणूस कोणता?

**प्र. ३. पाणी टंचाईमुळे तुम्हांला पाणी दुरून आणायचे आहे. कमी श्रमात ते आणण्यासाठी तुम्ही काय प्रयत्न कराल?**

**प्र. ४. विरुद्धार्थी शब्द लिहा.**

(अ) हित × (आ) अवघड × (इ) निकृष्ट × (ई) कीर्ती ×

**प्र. ५. खाली दिलेल्या उदाहरणाप्रमाणे चौकट पूर्ण करा.**

| गाडी–गाडीवान | चतुर–चतुराई | खरा–खरेपणा |
|---|---|---|
| ..........–धनवान | महाग–.......... | ..........– साधेपणा |
| ..........– दयावान | ..........– स्वस्ताई | ..........– शहाणपणा |
| बल– .......... | ..........–नवलाई | भोळा–.......... |

**प्र. ६. खालील शब्द वाचा व समजून घ्या.**

(अ) चतुर – चातुर्य (इ) क्रूर– क्रौर्य (उ) सुंदर – सौंदर्य

(आ) चोरी – चौर्य (ई) शूर – शौर्य (ऊ) धीर – धैर्य

**प्र. ७. खालील शब्दांना तो, ती, ते शब्द लावून लिंग ओळखा.**


(अ) दरी (इ) माठ (उ) पुस्तक

(आ) पान (ई) लाडू (ऊ) वही

**प्र. ८. तुमच्या मित्राच्या/मैत्रिणीच्या चतुरपणाचे कौतुक झाल्याचा प्रसंग घरी व वर्गात सांगा.**

**प्र. ९. अप्पाजींसारख्या अनेक चतुर व्यक्ती इतिहासात होऊन गेल्या आहेत. उदा., बिरबल, तेनालीराम. यांच्या गोष्टी मिळवा. वाचा. वर्गात सांगा.**

**प्र. १०. खालील आकृतीत दिलेल्या शब्दांस विशेषणे लावा.**




**सुविचार**

आपल्या शिक्षणाचा जो देशासाठी उपयोग करतो तो सुशिक्षित समजावा.

शिक्षण म्हणजे आपले शरीर, मन व बुद्धी यांचा विकास होय.

**सांगा पाहू.**

शर्टाच्या खिशावर
रुबाबात बसतो,
काहीही लिहिण्यासाठी
माझ्याशिवाय पर्याय नसतो.

वेली अन् वनस्पतींनी
नटले मी फुलांनी,
खेळण्यासाठी मजेत
शोधले मला मुलांनी.

- **खालील तक्ता वाचा. समजून घ्या.**

| नाम/सर्वनाम | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| माया | खेळते. | खेळली. | खेळेल. |
| तो | खेळतो. | खेळला. | खेळेल. |
| तुम्ही | खेळता. | खेळलात. | खेळाल. |
| आम्ही | खेळतो. | खेळलो. | खेळू. |
| त्या | खेळतात. | खेळल्या. | खेळतील. |

- **दिलेल्या सूचनांप्रमाणे खालील वाक्यांत बदल करा.**

१. रिमा सहलीला गेली. (वाक्य भविष्यकाळी करा.)
२. मला आंबा आवडतो. (वाक्य भूतकाळी करा.)
३. चंदाने लाडू खाऊन संपवला. (वाक्य वर्तमानकाळी करा.)
४. सुभाष माझा मित्र आहे. (वाक्य भूतकाळी करा.)
५. वंदना अभ्यास करते. (वाक्य भूतकाळी करा.)
६. संजू क्रिकेट खेळतो. (वाक्य भविष्यकाळी करा.)

- **पूर, गाव, नगर, बाद ही अक्षरे शेवटी असणाऱ्या गावांची, शहरांची, ठिकाणांची नावे खालील तक्त्यात लिहा.**

| गाव | पूर | नगर | बाद |
|---|---|---|---|
| मानगाव | सोलापूर | अहमदनगर | औरंगाबाद |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

# १५. होळी आली होळी

- ऐका. म्हणा. वाचा.

होळी आली होळी
खावी पुरणाची पोळी,
झाडे, फांद्या तोडू नका,
केर-कचरा खड्ड्यात टाक



होळी आली होळी
भरा सद्गुणांची झोळी,
अनिष्ट रूढी, प्रथांची
बांधू होळीसाठी मोळी.

होळी आली होळी
ठेवू पर्यावरणाचे भान,
नका तोडू वृक्ष राजी
घ्यावी आज अशी आण.



होळी आली होळी
पळून गेली दूर थंडी,
ऊन आता लागलंय वाढू
काढा कपाटातून बंडी.

होळीचा हा सण असा
जो कोणी साजरा करील,
निसर्गराजा त्याच्या घरी
स्वत: येऊन पाणी भरील.

**-दिलीप पाटील**

**शब्दार्थ :** **अनिष्ट** - वाईट. **बंडी** - एक प्रकारचे वस्त्र. **आण** - शपथ. **पाणी भरणे** - मदत करणे.

## स्वाध्याय



**प्र. १. एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) होळीला करायचा गोड पदार्थ-

(आ) केरकचरा टाकायचे ठिकाण-

**प्र. २. एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) कवीने काय तोडण्यास मनाई केली आहे?

(आ) होळीच्या वेळी झोळी कशाने भरावी?

(ई) होळीसाठी मोळी कशाची बांधावी?

(उ) कवीने होळीच्या दिवशी कोणती शपथ घ्यायला सांगितली आहे?

(ऊ) कवीच्या मताप्रमाणे होळी साजरी केल्यास त्याच्या घरी कोण पाणी भरेल?

**प्र. ३. 'पर्यावरणाचे भान ठेवून होळी साजरी करा.' याबाबत तुमचे मत दोन-तीन वाक्यांत लिहा.**

**प्र. ४. 'होळी'च्या सणाची तयारी तुम्ही कशी कराल ते लिहा.**

**प्र. ५. तुमच्या परिसरात 'आदर्श होळी' साजरी करण्यासाठी एक सूचनाफलक तयार करा.**

**सूचनाफलक**


झाडे तोडू नका.

______________________

______________________

______________________

**प्र. ७. होळी हा सण 'फाल्गुन' या मराठी महिन्यात येतो. त्याप्रमाणे खालील तक्ता दिनदर्शिका पाहून पूर्ण करा.**




- **खालील सूचना वाचा. अशा आणखी सूचना तयार करा.**

नदीच्या पाण्यात केरकचरा, निर्माल्य टाकू नये.

ओला कचरा, सुका कचरा ठेवा वेगवेगळा,
तरच प्रदूषणाला बसेल आळा.

# १६. मुक्या प्राण्यांची कैफियत



(माणूस वनामध्ये गाई चारायला घेऊन गेला होता. गाय चरत असताना एक चिमणी उडत उडत तिच्याजवळ येते.)

चिमणी : चिव चिव चिव गं! तिकडे तू कोण गं?

गाय : अगं मी कपिला मावशी
का गं चिऊ उदास दिसशी?

चिऊ : काय सांगू गाई गाई,
छाती धडधडते पहा बाई!
काय करू सुचतच नाही!
भीती फार वाटते बाई ॥

गाय : अगं अगं चिऊताई ।
मोबाइलचा आवाज,
तुज सहन न होई ॥
तू आहेस नाजुकशी ।
आवाजाने होशी कासाविशी ॥
(गायही आपले डोळे पुसते.)

चिऊ : कपिला मावशी काय गं झाले?
तुझेसुद्धा डोळे का पाणावले?

गाय : काय सांगू चिऊताई!
प्लॅस्टिकचा बघ ढीग किती?
घासाबरोबर प्लॅस्टिक जाते
माझे तर पोटशूळच उठते!!

चिऊ : काय करावे, सुचत नाही
मानव शहाणा होतच नाही.

गाय : चल गं जाऊ तलावावर,
पाणी पिऊ घोटभर ।
(दोघी तलावाच्या काठावर जातात.)

मासोळी : अगं कपिला, अगं चिऊ ।
नका इथले, पाणी पिऊ ॥

चिऊ : का गं, का गं मासोळी?
तू तर राहतेस याच जळी ॥

मासोळी : अगं इथले जल विषारी ।
तगमग जीवाची होते भारी ॥
पाणी आहे घाण घाण ।
तडफडती जलचरांचे प्राण ॥

गाय : ते बघ आले नागोबा.

चिऊ : (नागोबास उद्देशून बोलते.)
अहो, अहो नागोबा
आज का झाले रागोबा?

नागोबा : नाही वारूळ, नाही शेती
मला पकडून, लाह्या देती!
नको नको ती अंधश्रद्धा
मानवा, डोळे जरा उघड आता!

गाय : (माणसाला उद्देशून बोलते.)
का मुक्या प्राण्यांना देता त्रास?
का जंगलांचा करता ऱ्हास?
वाघोबा मग घालतात झडप
तुम्हांलाच करतात पोटात गडप!

सर्व प्राणी : मानवा मानवा ऐक तर खरे.
वनचरे आता नच तुझे सोयरे
करत राहाशील जर प्रदूषित सारे
धरती माता देईल दूषणे
तडफडशील मग दूधाविना
तडफडशील मग अन्नाविना
तेव्हाच होईल आमचे स्मरण



जागृत होऊन राखशील पर्यावरण
पर्यावरण! पर्यावरण!
(माणूस खाली मान घालतो.)

माणूस : नका नका हो असे बोलू,
आम्ही आमचे वर्तन बदलू
पर्वत, जल, वातावरण
नाही करणार प्रदूषण ॥
सदा करीन वृक्षारोपण
हिरवेगार वनीकरण ॥
कीटक, पक्षी अन् जलचर
सगेसोयरे तुम्ही वनचर ॥

**– ज्योती वैद्य – शेटे**

**शब्दार्थ : कैफियत–** तक्रार. **कासावीस होणे–** व्याकूळ होणे. **डोळे पाणावणे–** दु:ख होणे, रडू येणे. **पोटशूळ उठणे–** पोट दुखणे. **जलचर–** पाण्यात राहणारे प्राणी. **डोळे उघडणे–** जागरूक होणे, सावधान होणे. **सगेसोयरे–** नातेवाईक. **ऱ्हास–** नष्ट. **दूषण देणे–** दोष देणे. **स्मरण–** आठवण. **वनचरे–** वनात राहणारे प्राणी.

## स्वाध्याय



**प्र. १. तक्रार व वनचर यांच्या माध्यमातून जोड्या पूर्ण करा.**

| | तक्रार | वनचर |
|---|---|---|
| (१) | मोबाइलच्या आवाजाची भीती | चिमणी |
| (२) | प्लॅस्टिक सेवनाने पोटदुखी | |
| (३) | | मासोळी |
| (४) | वारूळ, शेत नष्ट | |

**प्र. २. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) या पाठात कोणाकोणांत संवाद झालेला आहे?
(आ) चिमणीला कोणता त्रास होतो?
(इ) गाईचे डोळे का पाणावले?
(ई) मासोळीने आपली कोणती समस्या मांडली आहे?
(उ) नागोबाची तक्रार कोणती आहे?

**प्र. ३. घोटभर, मैलभर, तासभर, कणभर, चमचाभर हे शब्द वापरून वाक्ये लिहा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून या संवादपाठाचे सादरीकरण करून घ्यावे.

**प्र. ४. कोण ते सांगा (वनचर, भूचर, जलचर, उभयचर)**

(१) पाण्यात राहणारे– (३) जंगलात राहणारे–

(२) जमिनीवर राहणारे– (४) जमीन व पाणी या दोन्ही ठिकाणी राहणारे–

**प्र. ५. खालील शब्दांचे समानार्थी शब्द पाठातून शोधून लिहा.**

(१) किनारा– (३) जल– (५) मासा–

(२) शेवट– (४) आठवण– (६) नातेवाईक–

**प्र. ६. खालील शब्दांचे अर्थ शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.**

सगेसोयरे, पाहुणे, नातेवाईक, भाऊबंद

**प्र. ७. खालील शब्दांचे लिंग बदला.**

(१) चिमणी – (२) नाग – (३) वाघ –

**प्र. ८. खालील वाक्यांत कंसातील योग्य वाक्प्रचार घाला.**

(उदास दिसणे, कासावीस होणे, डोळे पाणावणे, डोळे उघडणे.)

(अ) सह्याद्री डोंगर चढताना आमचा जीव पाणी पिण्यासाठी .................... होत होता.

(आ) आवडते पेन हरवल्याने संजय आज .................... होता.

(इ) पाणीटंचाई भासू लागताच पाणी बचतीबाबत सर्वांचे .................... उघडले.

(ई) रस्त्यावर घडलेला अपघात बघून सर्वांचे .................... .

**प्र. ९. धडधड, तगमग यासारखे आणखी शब्द लिहा.**

- **खालील चौकटीत काही प्राणी व काही पक्ष्यांची नावे लपलेली आहेत. ते शोधा व त्यांची नावे लिहा.**

**उदा., वटवाघूळ**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सिं | ह | ब | द | क | लां | का |
| या | त्ती | ग | स | बु | ड | ळ |
| का | व | ळा | सा | त | गा | वी |
| बि | कि | ट | मो | र | य | ट |
| को | टि | ग | वा | घ | गें | डा |
| ब्रा | ल्हा | ट | उं | घू | स | ड |
| जि | रा | फ | वी | ट | ळ | गा |

- दवाखान्याच्या ठिकाणी लावलेल्या पाट्या वाचा. त्या पाट्यांमध्ये आपल्याला सूचना दिलेल्या असतात. या सूचनांव्यतिरिक्त आणखी काही सूचनांच्या पाट्या तुम्ही तयार करा.

**दवाखाना**

शांतता राखा.

स्वच्छता राखा.



रुग्णाला भेटण्याची वेळ
सकाळी : १० ते ११ वा.
संध्याकाळी : ५ ते ७ वा.

रुग्णाला भेटायला येणाऱ्यांनी गर्दी करू नये.

रुग्णाजवळ एकाच व्यक्तीने थांबावे.

- वरीलप्रमाणे शाळेच्या परिसरात स्वच्छताविषयक पाट्या लावायच्या आहेत, तर तुम्ही कोणत्या पाट्या तयार कराल.

**शाळा**



- **'पर्यावरण संरक्षण' याविषयी पाठाच्या शेवटी माणसाने केलेली प्रतिज्ञा तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्रतिज्ञा**

आम्ही आमचे वर्तन बदलू.

_______________

_______________

_______________

- **वाचा. समजून घ्या.**

| | |
|---|---|
| दैनिक | दररोज निघणारे, प्रकाशित होणारे |
| साप्ताहिक | सप्ताहातून एकदा प्रकाशित होणारे |
| पाक्षिक | पंधरा दिवसांतून एकदा प्रकाशित होणारे |
| मासिक | महिन्यांतून एकदा प्रकाशित होणारे |
| त्रैमासिक | तीन महिन्यांतून एकदा प्रकाशित होणारे |
| अर्धवार्षिक | सहा महिन्यांतून एकदा प्रकाशित होणारे |
| वार्षिक | वर्षातून एकदा प्रकाशित होणारे |

## आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द पाहा.**

१. ही माझी छत्री आहे.

२. तू कोणाचा मुलगा आहेस ?

३. मी कालच गावाहून आलो.

४. जी वेगाने पळेल, ती जिंकेल.

अधोरेखित केलेले शब्द 'एकाक्षरी' शब्द आहेत. एकाक्षरी शब्दांना द्यायची वेलांटी किंवा उ-कार नेहमी दीर्घ लिहितात. या नियमाला फक्त 'नि' हा शब्द अपवाद आहे. खालील शब्दांपासून वाक्ये बनवा.

१. ती –　　२. पी –　　३. मी –　　४. ही –


- **खालील शब्द वाचा. शब्दांतील शेवटच्या अक्षराला दिलेली वेलांटी, उ-कार समजून घ्या.**

चिमणी, विळी, मिरची, कढई, चटई, सफाई, खिडकी, मागू, चिकू, पेरू, नाचू, वस्तू, गाऊ, शिंगरू, कांगारू, ताई, समई, पाहुणी, पाणी.

मराठी भाषेत शब्दांतील शेवटच्या अक्षराला द्यायची वेलांटी किंवा उ-कार नेहमी दीर्घ लिहितात. या नियमाला 'आणि', 'परंतु' हे शब्द अपवाद आहेत.

# १७. पाणपोई

● ऐका. म्हणा. वाचा.



उन्हात घामेजुनी अंगाची होतीया लाहीलाही
सूर्यकिरणांची लागती उष्णगरम झळाई,
आठवते दग्ध उन्हातली थंडगार सराई
वटवृक्षाच्या सावलीत थाटलेली पाणपोई.

रखरखत्या उन्हात सुटतो अवखळ वारा
धुळीसंगे पालापाचोळा जाई या उंच अंबरा,
थकलेल्या वाटसरूला ग्लानी येती गरागरा
पिऊनी पाण्याचा घोट तेव्हा महत्त्व कळे खरा.

या दिवसांत चोहीकडे पडते कडक ऊन
सारखीसारखी लागते साऱ्यांना मोठी तहान,
पिण्यास ठेवतात पाण्याने भरलेले रांजण
'रंक असो वा राव,' हे पाणी पितात सारेजण!

झाकलेला लाल कपडा, गार पाणी रांजणात
भरपेट पाणी पिऊनी तृप्त वाटते मनात,
धन्य असो ज्याने थाटिली ही पाणपोई उन्हात
पिऊनीया पाणी दुवा देती सारे त्या सज्जनास.

**– अय्युब पठाण लोहगावकर**

**शब्दार्थ : अंगाची लाही लाही होणे** – उन्हामुळे अंगाची आग होणे. **दग्ध ऊन** – भाजणारे ऊन. **पाणपोई** – वाटसरूंना, रस्त्याने येणाऱ्या-जाणाऱ्यांना पाणी पिण्यासाठी केलेली सोय. **रखरखते ऊन** – खूप कडक ऊन. **ग्लानी येणे** – चक्कर येणे, धुंदी येणे. **रंक** – गरीब. **राव**– श्रीमंत. **तृप्त होणे** – समाधानी होणे.

## स्वाध्याय



प्र. १. एका-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) अंगाची लाही लाही कशामुळे होते?

(आ) अवखळ वारा सुटल्यावर काय होते?

(इ) थकलेल्या वाटसरूला ग्लानी का येते ?

(ई) पाणपोईवर पाणी पिण्यास कोण कोण येतात?

(उ) ज्यांनी पाणपोई थाटली त्याला आशीर्वाद का देतात?

प्र. २. उष्णगरम, थंडगार, पालापाचोळा या शब्दांतील दोन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत, असे शब्द शोधा व लिहा.


प्र. ३. घामेजणे, लाही लाही होणे, उष्णगरम झळाई, रखरखते ऊन, तहान लागणे या शब्दसमूहांचा वापर करून पाच-सहा वाक्ये लिहा.

प्र. ४. रखरख, गरगर यांसारखे अक्षरांची पुनरावृत्ती होणारे शब्द शोधा व लिहा.

प्र. ५. पाणपोई हा पाण्याशी संबंधित शब्द आहे. तसेच खालील शब्द वाचा व समजून घ्या.

पाणबुड्या, पाणलोट, पाणवठा, पाणथळ, पाणकोंबडा, पाणघोडा, पाणवनस्पती.

प्र. ६. ऊन या शब्दाला विशेषणे लावलेली आहेत. ती वाचा व समजून घ्या.




प्र. ७. खालील विरुद्धार्थी शब्द लिहा.

(अ) गार × (आ) रंक × (इ) ऊन ×

(ई) तृप्त × (उ) दुवा × (ऊ) सज्जन ×

प्र. ८. तुम्हांला खूप तहान लागली असताना अचानक पाणपोई दिसली, तर तुमच्या मनात कोणते विचार येतील ते लिहा.

प्र. ९. चालून चालून थकलेल्या वाटसरूला थंडगार पाणी मिळाल्यावर त्याला काय वाटत असेल, कल्पना करा व लिहा.

प्र. १०. तुमच्या गावातील एखाद्या पाणपोईवर जा. पाणपोई कोणी काढली, ती काढण्यामागचा उद्देश, त्याची निगा कशी राखतात, पाणी कसे भरले जाते याची माहिती घ्या. ही एक मोठी समाजसेवा कशी आहे, याबद्दल सात-आठ ओळी लिहा.

## • आपण हे करूया!

(गाव पाराची वाडी. नेहमीप्रमाणे मुले गल्लीतील झाडाखाली गोळा झाली आहेत. झाडाच्या पारावर गल्लीतील दोन आजोबा बसले आहेत.)

**विजू** : अरे भरत, पाणपोई उभी करायची ठरले, तर किती पैसे लागतील?

**भरत** : किती जमले आहेत ते तर पाहू!

**सरू** : खेळाच्या सामानासाठी पैसे जमवले अन् तुमच्या मनात हे भलतेच विचार कसे आले?

**शकील** : अगं, तुला पाणपोईचा विचार आवडला नाही का?

**सरू** : तसे नाही रे! खेळाचे सामान आपण एवढ्या पैशात खरेदी करू शकत होतो. आता पाणपोई उभारायची तर मोठ्यांची मदत घ्यावी लागेल.

**आजोबा** : अरे बाळांनो, आम्ही बराच वेळ तुमच्या गप्पा ऐकतोय. तुम्ही लोकोपयोगी व कल्याणकारी काम करताय. आम्ही तुमच्याबरोबर नेहमीसारखे आहोत. बरे सांगा, कधी जायचे खरेदीला?

**भरत** : आजोबा, कशाकशाची खरेदी करावी लागेल?



**आजोबा :** दोन माठ, त्यावर झाकणी, ओगराळे, पेले व सुती कापड.

**विजू :** कापड कशाला?

**आजोबा :** अरे, कापड ओले करून माठाभोवती गुंडाळले, तर माठातले पाणी थंड राहते. पण पाणपोई उभी करायची कुठे?

**शकील :** आमच्या घराजवळ खूप जागा आहे व डेरेदार झाडही आहे. त्याखाली ठेवूया माठ.

**सरू :** तुझ्या आई-बाबांना विचारून ठेव.

**शकील :** अरे आपले ठरले तेव्हाच सांगितले आहे. ते कधीच नाही म्हणणार नाहीत. त्यांना मदत करायला खूप आवडते.

**भरत :** माझी आई रोज पक्ष्यांसाठी मला पाणी ठेवायला लावते. त्यातूनच माझ्या डोक्यात ही पाणपोईची कल्पना सुचली, अन् मी आई-बाबांना सांगितली.

**आजोबा :** खूप कडक उन्हाळा आहे. उन्हाच्या या झळयांनी तोंड कोरडे पडते. सारखे पाणी प्यावेसे वाटते. तुमच्या या पाणपोईमुळे रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्यांची तहान तरी भागेल.

**सरू :** आजोबा, ओगराळे कशाला? पेल्याने पाणी घेता येते ना.

**भरत :** अगं सरू, आपण ओगराळ्याने आपल्याला हवे तेवढेच पाणी घेऊ शकतो; आणि ओगराळे वापरल्याने अस्वच्छ हात पाण्यात बुडत नाहीत.

**आजोबा :** समजले का सरू ओगराळे का वापरावे ते? रोज माठात पाणी कोण भरणार? त्याचे काही नियोजन करूया का मुलांनो?

**विजू :** हो आजोबा! सकाळी पाणी येते, तेव्हा आपण माठात पाणी भरूया. रात्री माठ रिकामे होतील, तेव्हा ते स्वच्छ विसळून, धुवून ठेवूया. आई म्हणाली, 'नारळाच्या केशराने करवंटीने माठ घासल्यास ते आणखी स्वच्छ होतात.'

**सरू :** आपण तिथं सूचनाफलकही लावू.

**भरत :** अरे वा! चांगली कल्पना आहे. कोणत्या सूचना लिहूया.

**सरू :** 'हे पिण्याचे पाणी आहे.' 'पिण्यासाठी हवे तेवढेच पाणी घ्यावे'. 'पाणी जपून वापरावे', 'पाणी हे जीवन आहे.'

**आजोबा :** शाबास मुलांनो, तुम्हांला पाण्याचे महत्त्व कळले. हे बघून आम्हा वृद्धांना खूप आनंद झाला. सर्वांनी पाण्याचा वापर काटकसरीने केला, अपव्यय टाळला, तर पाण्याची टंचाई कमी होईल.

## ● विचार करून सांगा!

**प्र. १. पाराची वाडी या गावातील मुलांनी केलेल्या उपक्रमाबद्दल तुमचे मत सांगा.**

**प्र. २. आपण एखादी गोष्ट किंवा उपक्रम करतो, तेव्हा घरातील मोठ्या माणसांना सांगणे आवश्यक आहे का? तुमचे मत सांगा.**

**प्र. ३. अशा प्रकारचे कोणकोणते सामाजिक उपक्रम करावे असे तुम्हांला वाटते? ते उपक्रम थोडक्यात सांगा.**

**प्र. ४. 'पाणी' या विषयावरची घोषवाक्ये तयार करून त्याच्या पाट्या तयार करा.**

**प्र. ५. 'पाणी हेच जीवन' यांवर आधारित दहा ओळी लिहा.**

**प्र. ६. तुम्ही एखादा उपक्रम केला असेल, तर त्याबाबतची माहिती मित्राला पत्राने कळवा.**

- **खालील उतारा वाचा. त्या उताऱ्यात पूर्णविराम (.) स्वल्पविराम (,) प्रश्नचिन्ह (?) उद्‌गारचिन्ह (!) आणि एकेरी अवतरणचिन्ह (‘–’) घाला व उतारा पुन्हा लिहा.**

एका छोट्याशा गावात एक सधन शेतकरी राहत होता शेतात काम करणाऱ्या दोन बैलजोड्या त्याच्याकडे होत्या तसेच दोन म्हशीही होत्या आणि एक चांगली धष्टपुष्ट आणि पुष्कळ दूध देणारी कपिला नावाची गायही होती त्यामुळे त्याच्या घरी भरपूर दूधदुभते असे ते दूध तो साऱ्या गावात विके

एकदा अशीच सारी गुरे नीट बांधून तो शेतकरी घरात जाऊन झोपला पण सकाळी उठून पाहतो तो त्याची गाय तिथे नव्हती. अगदी कासावीस झाला तो पांढरा आणि तपकिरी रंग असलेली ती गाय त्याची खूप लाडकी होती. लोक मुद्दाम गाईचे दूध तूप दही नेत असत आता लोकांना काय सांगणार काय करावे शेवटी तो शेजारच्या गावी दुसरी गाय विकत आणण्यासाठी गेला बाजार गुरांनी भरून गेला होता निरनिराळ्या रंगांच्या धिप्पाड मध्यम आणि बऱ्यापैकी दूध देणाऱ्या अशा अनेक गाई त्याने पाहिल्या गाई बघत तो असाच पुढे जात असताना एका गाईजवळ येऊन तो थांबला अन काय आश्चर्य कपिलेने त्याच्याकडे पाहिले त्याचे ही डोळे चमकले अरे ही तर आपली गाय कपिला नक्कीच या माणसाने त्या दिवशी माझी गाय चोरून नेली असावी आपल्या गाईच्या पाठीवर त्याने प्रेमाने थाप मारली कपिलेने त्याला ओळखले तिने आनंदाने कान व शिंगे हालवली

## ● खालील चौकटीत दिलेली अपूर्ण गोष्ट पूर्ण करा.

एकदा काय झालं, आपल्या शरीराचे दोन हात, उजवा आणि डावा एक दिवस चक्क भांडायला लागले. उजवा हात म्हणाला, ‘‘आजपासून मी आराम करणार!’’ मग डावा म्हणाला, ‘‘का, काय झालं? तू का आराम करणार?’’ ‘‘मी मोठा आहे, तुझ्यापेक्षा माझा मान जास्त आहे.’’ उजवा हसून म्हणाला, ‘‘वा!वा! म्हणे मी मोठा आहे. अरे, जा मी तुला मोठा मानतच नाही. अरे माझ्याशिवाय पान हालत नाही माहीत आहे का तुला?’’ उजवा हात म्हणाला. दोन्ही हातांचे बराचवेळ भांडण चालले होते. इतकावेळ शांत बसलेले डोके मग रागाने म्हणाले, ‘‘अरे थांबा हे काय चाललंय? तुमच्या दोघांत चांगले काम कोण करतो हेच मी पाहणार आहे.’’ ‘‘हो! हो! पाहाच!’’ उजवा हात म्हणाला. ‘‘ मी पण तयार आहे.’’ डावा म्हणाला. दोन्ही हात तयार झाले. ‘‘चला तर मग, तो पाहा त्या तिथे एक दगड चिखलात रुतून बसलाय. बघू त्याला कोण बाहेर काढतंय.’’ डोक्याने असे म्हणताच उजवा म्हणाला, ‘‘मी काढणार! माझा पहिला नंबर.’’ तेव्हा डावा म्हणाला, ‘‘जा जा! तुझी किती ताकद आहे.’’ डावा असे म्हणताच मोठ्या ऐटीत उजवा निघाला. ..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

- इयत्ता पाचवीमध्ये तुमचा शब्दसंग्रह तुम्ही तयार केला आहे. शब्दसंग्रह किंवा शब्दकोश कसा पाहावा हे आपण पाहूया.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| गोरा, गंमत, गुलाब, गवत, गौतमी, गाणे, गैबत, गेनबा, गीता, गिरणी, गूळ | गवत, गाणे, गिरणी, गीता, गुलाब, गूळ, गेनबा, गैबत, गोरा, गौतमी, गंमत |

- वर दिलेले 'अ' गटातील व 'ब' गटातील शब्द वाचा.
'अ' गटातील शब्द हे बाराखडीतील स्वरचिन्हानुसार दिलेले नाहीत.
मात्र 'ब' गटातील शब्द हे बाराखडीतील स्वरचिन्हानुसार दिलेले आहेत.

- पाठ्यपुस्तकातील पाठ २ आणि पाठ ३ मधील शब्दार्थ खालील चौकटीत दिले आहेत.

'अ' गट

लुकलुकणे–चमकणे.
तल्लीन होणे–दंग होणे, गुंग होणे.
कडकडून भेटणे–प्रेमाने मिठी मारणे.
बिलगणे–प्रेमाने जवळ येणे.
गहिवरून येणे–मन भरून येणे.
धमाल–मजा.
पाडाचा आंबा–अर्धवट पिकलेला आंबा.
आमराई–आंब्याच्या झाडांची बाग.
ऐन दुपारी– भर दुपारी.
भणाण वारा – वाऱ्याचा भयभीत करणारा आवाज.
खचणे– खाली खाली जाणे, ढासळणे.
चडफड– राग.
गिल्ला करणे–गोंधळ करणे.

- पाठ्यपुस्तकातील पाठ २ आणि पाठ ३ मधील शब्दार्थ शब्दकोशाप्रमाणे खालील चौकटीत दिले आहेत.

'ब' गट

(१) आमराई–आंब्याच्या झाडांची बाग.
(२) ऐन दुपारी– भर दुपारी.
(३) कडकडून भेटणे–प्रेमाने मिठी मारणे.
(४) खचणे– खाली खाली येणे, ढासळणे.
(५) गहिवरून येणे–मन भरून येणे.
(६) गिल्ला करणे–गोंधळ करणे.
(७) चडफड– राग.
(८) तल्लीन होणे–दंग होणे, गुंग होणे.
(९) धमाल–मजा.
(१०) पाडाचा आंबा–अर्धवट पिकलेला आंबा.
(११) बिलगणे–प्रेमाने जवळ येणे.
(१२) भणाण वारा – वाऱ्याचा भयभीत करणारा आवाज.
(१३) लुकलुकणे–चमकणे.

- **आले का लक्षात?**

'क, ख ..... ज्ञ' या अक्षरांच्या क्रमानुसार व बाराखडीतील चिन्हानुसार वरील शब्द लिहिले आहेत. शब्दकोश पाहताना याच पद्धतीने पाहा. पाठ्यपुस्तकातील किंवा पाठ्येतर साहित्यातील शब्दांचे अर्थ पाहताना या पद्धतीने शब्दकोश पाहा. पाठ्यपुस्तकातील इतर पाठांमध्ये आलेले शब्दार्थ पाहा व शब्दकोशाप्रमाणे लिहून अधिकचा सराव करा.




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी सुलभभारती इ. ६ वी

₹ २७.००